दैनिक हिंदू प्रकाशवार्ता
epaper.hinduprakashwarta.com
Web portal : hinduprakashwarta.com
PRGI No.: MHMAR/25/A2358
सत्याचा प्रकाश, राष्ट्रवादाचा प्रहरी
छत्रपती संभाजीनगर | रविवार, दि. २६ जुलै २०२६ | वर्ष : १ | अंक : ९६ | पाने : ४ | किंमत : ४ रु. | Email : hinduprakashvarta@gmail.com

## चॅटजीपीटीची सेवा ठप्प; भारतासह जगभरातील युजर्स त्रस्त

**मुंबई :** कृत्रिम बुद्धिमत्तेच्या (AI) विश्वात जगभरात सर्वाधिक वापरल्या जाणाऱ्या 'ChatGPT' या लोकप्रिय AI चॅटबॉटची सेवा शनिवारी अचानक विस्कळीत झाल्यामुळे खळबळ उडाली आहे. भारत, अमेरिका, युरोप, जपान आणि ऑस्ट्रेलियासह जगातील अनेक देशांमध्ये चॅटजीपीटीचे सर्व्हर डाऊन झाल्यामुळे कोट्यवधी युजर्सना तांत्रिक अडचणींचा सामना करावा लागला. डिजिटल सेवांमधील बिघाडाची नोंद ठेवणाऱ्या 'DownDetector' या संकेतस्थळावर काही मिनिटांतच हजारो वापरकर्त्यांनी सेवा ठप्प झाल्याच्या तक्रारी नोंदवण्यास सुरुवात केली.

## मी राज्यात समाधानी - मुख्यमंत्री

**मुंबई :** मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांना केंद्रीय मंत्रिमंडळात मोठी जबाबदारी मिळेल, असे दावे विरोधकांकडून सातत्याने केले जात आहेत. त्यावर भाष्य करताना, मी महाराष्ट्रात समाधानी आहे, असे फडणवीस यांनी शनिवारी स्पष्ट केले. आषाढी एकादशीच्या शुभमुहूर्तावर पंढरपूर येथे श्री विठ्ठल-रुक्मिणीची महापूजा संपन्न झाल्यानंतर प्रसारमाध्यमांशी बोलताना त्यांनी विविध विषयांवर भाष्य केले. दिल्लीत जाण्याच्या सर्व चर्चा फेटाळून लावताना मुख्यमंत्र्यांनी 'तुका म्हणे उगे रहावे, जे जे होईल ते पहावे, चित्त असू द्यावे समाधानी' या ओळींचा संदर्भ दिला. "माझे चित्त पूर्णपणे समाधानी आहे.

## थोडक्यात वार्ता

### नाशिकरांनो काळजी घ्या ! शहरात डेंग्यूचे 22 रुग्ण

**नाशिक :** नाशिक शहरात पावसाचे आगमन झाल्यानंतर आता नवी समस्या नाशिककरांना सतावत आहे. नाशिक शहरात आता डेंग्यूचा उद्रेक पहायला मिळत असून जुलैच्या तीन आठवड्यात २२ डेंग्यूचे रुग्ण आढळून आले आहेत. तर डेंग्यूच्या संशयितांचा आकडा २६० पर्यंत पोहचला आहे. डेंग्यूसोबत चिकनगुनियाचेही २ रुग्ण आढळून आल्याने नाशिकमध्ये साथीच्या आजाराने डोके वर काढल्याचे एकंदरीत चित्र आहे. पावसाळा आला की डेंग्यू, मलेरिया, चिकनगुनिया यासारख्या साथीच्या आजारांचा प्रादुर्भाव होण्यास सुरुवात होते. अशावेळेस काळजी घेणे फार गरजेचे आहे. दरम्यान डेंग्यूचा प्रादुर्भाव नाशिकमध्ये सुरु झाला असून डेंग्यूचे २२ रुग्ण आढळून आले आहेत. घरांच्या परिसरातील भंगार साहित्य, निकामी टायर्स, शोभेच्या झाडांच्या कुंड्यांमध्ये पावसाचे पाणी साचून त्यात डेंग्यूस कारणीभूत ठरणाऱ्या डासांची पैदास झाल्याने नाशिककरांना डेंग्यूची लागण झाली आहे.

### भोंदूबाबा अशोक खरातचा आणखी एक कारनामा उघड

**नाशिक :** नाशिकमधील बहुचर्चित अशोक खरात प्रकरणात आता आणखी एक धक्कादायक खुलासा समोर आला आहे. स्वतःला आध्यात्मिक सल्लागार आणि ज्योतिषी म्हणून सादर करणाऱ्या अशोक खरातकडे ज्योतिषशास्त्र किंवा अंकशास्त्राचे कोणतेही औपचारिक शिक्षण, प्रशिक्षण किंवा मान्यताप्राप्त प्रमाणपत्रच नसल्याचा दावा अंमलबजावणी संचालनालयाने म्हणजेच ईडीने आपल्या अभियोग तक्रारीत केला आहे. तरीही तब्बल दोन दशकांहून अधिक काळ त्याने प्रभावशाली व्यक्तींमध्ये आपली प्रतिमा निर्माण करून मोठ्या प्रमाणात आर्थिक व्यवहार केल्याचा आरोपही करण्यात आला आहे. अशोक खरात प्रकरणात आर्थिक गैरव्यवहार आणि मनी लॉंड्रिंगच्या आरोपांची चौकशी सुरू असतानाच ईडीच्या अभियोग तक्रारीत अनेक गंभीर दावे करण्यात आले आहेत.उत्पन्नाच्या तुलनेत प्रचंड संपत्ती जमा केल्याच्या आरोपांची चौकशी करताना ईडीने अशोक खरातची सखोल चौकशी केली. या चौकशीत खरातने स्वतः कबूल केल्याचा दावा ईडीने केला आहे की, त्याने कधीही ज्योतिषशास्त्र किंवा अंकशास्त्राचे कोणतेही औपचारिक शिक्षण घेतले नव्हते. तसेच कोणतेही अधिकृत प्रशिक्षण किंवा मान्यताप्राप्त प्रमाणपत्रही त्याच्याकडे नव्हते.

### पंतप्रधान 26 जुलैला विकसित व्हायब्रंट व्हिलेज प्रोग्राम मधील सहभागींशी साधणार संवाद

**नवी दिल्ली :** पंतप्रधान नरेंद्र मोदी 26 जुलै 2026 रोजी दुपारी 4.30 वाजता दूरदृश्य प्रणाली द्वारे, 'विकसित व्हायब्रंट व्हिलेज प्रोग्राम 2026' मधील सहभागींशी संवाद साधणार आहेत. भारतातील सीमावर्ती गावांना देशातील 'पहिले गाव' मानणे आणि 'विकसित भारत'च्या प्रवासात त्यांना सक्रिय भागीदार बनवणे या पंतप्रधानांच्या संकल्पनेची पूर्तता करण्यासाठी 'माय भारत' द्वारे, 'विकसित व्हायब्रंट व्हिलेज प्रोग्राम'ची रचना करण्यात आली आहे. 'विकसित व्हायब्रंट व्हिलेज प्रोग्राम 2026' चे आयोजन 4 जून ते 30 जून 2026 दरम्यान दोन टप्प्यांत करण्यात आले असून, यात लडाख, हिमाचल प्रदेश आणि उत्तराखंडमधील 74 'व्हायब्रंट' (Always dedicated to work) गावांचा समावेश होता. 3 लाखांहून अधिक तरुणांनी भाग घेतलेल्या देशभरातील ऑनलाइन प्रश्नमंजुषा स्पर्धेतून प्रत्येक राज्य आणि केंद्रशासित प्रदेशांचे प्रतिनिधित्व करणाऱ्या 400 हून अधिक तरुणांची यासाठी निवड करण्यात आली होती.

# अखेर धर्मेंद्र प्रधानांचा राजीनामा

## प्रल्हाद जोशींकडे शिक्षण मंत्रालयाचा अतिरिक्त कार्यभार

**नवी दिल्ली :** नीट-यूजी परीक्षेतील कथित गैरप्रकारांनंतर मोठ्या प्रमाणात झालेल्या विद्यार्थी आंदोलनाच्या पार्श्वभूमीवर केंद्र सरकारमध्ये महत्त्वाचा बदल करण्यात आला आहे. धर्मेंद्र प्रधान यांचा शिक्षणमंत्री पदाचा राजीनामा राष्ट्रपतींनी मंजूर केला असून, आता केंद्रीय मंत्री प्रल्हाद जोशी यांच्याकडे शिक्षण मंत्रालयाचा अतिरिक्त कार्यभार सोपवण्यात आला आहे.

राष्ट्रपती भवनाकडून जारी करण्यात आलेल्या अधिसूचनेनुसार, धर्मेंद्र प्रधान यांचा राजीनामा तत्काळ प्रभावाने स्वीकारण्यात आला आहे. त्यानंतर उपभोक्ता व्यवहार, अन्न आणि सार्वजनिक वितरण मंत्रालयाची जबाबदारी सांभाळणारे प्रल्हाद जोशी यांना शिक्षण मंत्रालयाची अतिरिक्त जबाबदारी देण्यात आली आहे. नीट-यूजी परीक्षेतील कथित पेपर लीक आणि अनियमिततेच्या आरोपांनंतर



देशभरातील विद्यार्थ्यांमध्ये नाराजी निर्माण झाली होती. विद्यार्थ्यांनी परीक्षेच्या पारदर्शकतेवर प्रश्न उपस्थित करत आंदोलन सुरू केले होते. या पार्श्वभूमीवर धर्मेंद्र प्रधान यांनी शिक्षणमंत्री पदाचा राजीनामा दिल्याचे सांगण्यात येत आहे. याआधी पेपरफुटी प्रकरणावरून निर्माण झालेल्या तीव्र राजकीय आणि सामाजिक गदारोळाच्या पार्श्वभूमीवर केंद्रीय शिक्षणमंत्री धर्मेंद्र प्रधान यांनी पंतप्रधान नरेंद्र मोदींकडे आपला दोन पानी राजीनामा पाठवला.

राजीनामा देण्यापूर्वी धर्मेंद्र प्रधान यांनी सोशल मीडियावर एक भावनिक पोस्ट शेअर केली होती. यामध्ये त्यांनी गेल्या १० दिवसांत घडलेल्या घटनांमुळे आपल्याला अतीव वेदना झाल्याचे म्हटले आहे. "हा माझ्यासाठी वैयक्तिक प्रतिष्ठेचा प्रश्न अजिबात नाही. भारताची युवाशक्ती हीच या देशाची खरी आणि सर्वात मोठी ताकद आहे. मी देशाच्या युवाशक्तीला कोणत्याही दुष्टचक्रात अडकू देणार नाही, हा माझा ठाम निर्धार आहे," असे त्यांनी आपल्या संदेशात सांगितले.दरम्यान राष्ट्रीय परीक्षा एजन्सीच्या (NTA) तब्बल ४७ कर्मचाऱ्यांना बडतर्फ करण्यात आले आहे. तसेच, पेपरफुटी प्रकरणाच्या जलद आणि पारदर्शक चौकशीसाठी जलदगती न्यायालय (Fast Track Court) स्थापन करण्याची प्रक्रिया देखील आता वेगाने पुढे सरकली आहे. सरकारचे निर्णय बघून सोनम वांगचुक तसेच सीजेपीच्या सदस्यांनी उपोषण मागे घेतले असून आंदोलन समाप्त केल्याची घोषणा केली आहे.

## मुसळधार पावसाने सातशे कुटुंब बेघर; अनेकांचे स्थलांतर

**नाशिक :** नाशिक जिल्ह्यात झालेल्या मुसळधार पावसाने जिल्ह्यातील जवळपास सर्वच धरणे तुडुंब भरली आहे. ज्यामुळे अनेक धरणांतून पाण्याचा विसर्ग केला जात आहे. पावसामुळे गोदावरी नदीच्या पाणीपातळीत देखील वाढ झाली आहे. पाणीपातळीत वाढ झाल्याने निफाड तालुक्यातील चांदोरी आणि सायखेड्यात पूरस्थिती निर्माण होऊन शेकडो कुटुंबीयांवर बेघर होण्याची वेळ आलीय. तर चांदोरीत तब्बल ४०० कुटुंबांचे तर सायखेड्यात २५० कुटुंबांचे स्थलांतर करण्यात आले आहे. चांदोरीत या पुरामुळे तब्बल १०० तर सायखेड्यात १२५ दुकानांमधील मालाचे नुकसान झाल्याचा प्राथमिक अंदाज आहे.

## तरुणांना सूचना देण्याऐवजी संवाद साधणे आवश्यक

### सरसंघचालक डॉ. मोहन भागवत

**मुंबई :** आजच्या नवीन पिढीच्या जडणघडणीसाठी पालकांनी सूचना किंवा उपदेश देण्याऐवजी मुलांशी प्रत्यक्ष संवाद साधणे अत्यंत गरजेचे आहे, असे प्रतिपादन राष्ट्रीय स्वयंसेवक संघाचे सरसंघचालक डॉ. मोहन भागवत यांनी शनिवारी केले. भौतिक गोष्टींचा प्रभाव असणाऱ्या आणि माहितीच्या चक्रव्यूहात वाढणाऱ्या आजच्या तरुणांना कठोर पवित्र्यापेक्षा प्रेमाने व विश्वासाने गोष्टी समजावून सांगण्याची गरज असल्याचे त्यांनी नमूद केले. तसेच घरात मोबाईलच्या अतिवापरामुळे कमी होत चाललेल्या संवादाबद्दल चिंता व्यक्त करताना, पालकांनी स्वतः आदर्श आचरणाचा वस्तुपाठ मुलांसमोर ठेवावा, असा सल्लाही त्यांनी दिला.



विश्वमांगल्य सभेच्या वतीने आयोजित 'युगानुकूल मातृत्व' या विषयावरील प्रबोधन बैठकीच्या समारोप सत्रात डॉ. भागवत बोलत होते. या कार्यक्रमाला विविध क्षेत्रांतील ९०० हून अधिक प्रबुद्ध महिला उपस्थित होत्या. सरसंघचालक म्हणाले की, पूर्वीच्या काळात अनुभवाच्या आदरावर मोठ्यांचे बोलणे लगेच स्वीकारले जात असे. मात्र आज परिस्थिती वेगळी आहे. मुले सातत्याने प्रश्न विचारतात. "देवतांचा चेहरा हत्ती किंवा माकडासारखा का आहे?" अशा प्रश्नांची उत्तरे अनेकदा पालकांकडे नसतात. मुलांच्या जिज्ञासांचे निरसन करण्यासाठी पालकांनी स्वतःचे ज्ञान वाढवणे आवश्यक आहे.

# राज्यात पुढील दोन ते तीन दिवस मुसळधार पावसाचा इशारा

**मुंबई :** राज्यात पुढील दोन ते तीन दिवस पावसाचा जोर कायम राहणार असल्याचा इशारा भारतीय हवामान विभागाने दिला असून अनेक भागांमध्ये मुसळधार ते अतिमुसळधार पावसाची शक्यता व्यक्त करण्यात आली आहे. मान्सूनची प्रणाली अधिक सक्रिय झाल्यामुळे तसेच गुजरातपासून कर्नाटकपर्यंत कमी दाबाचा पट्टा तयार झाल्याने त्याचा परिणाम महाराष्ट्रातील बहुतांश भागांवर होत असल्याचे हवामान तज्ज्ञांनी स्पष्ट केले आहे.

विशेषतः पुणे आणि सातारा जिल्ह्यातील घाटमाथा परिसरात अतिमुसळधार पावसाचा इशारा देण्यात आला असून मुंबई, रत्नागिरी, सिंधुदुर्ग, कोल्हापूर आणि कोल्हापूर घाटमाथा परिसरासाठी येलो अलर्ट जारी करण्यात आला आहे. उत्तर कोकणात काही ठिकाणी मुसळधार ते अतिमुसळधार, तर काही भागांत अत्यंत मुसळधार पावसाची शक्यता वर्तविण्यात आली आहे. दक्षिण कोकण, गोवा आणि दक्षिण मध्य महाराष्ट्रातील घाट क्षेत्रांमध्येही जोरदार पावसाचा अंदाज व्यक्त करण्यात आला आहे.

# मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीसांच्या हस्ते विठ्ठल-रुक्मिणीची शासकीय महापूजा

**पंढरपूर :** आषाढी एकादशी निमित्त संपूर्ण पंढरपूर विठ्ठल नामाच्या गजराने दुमदुमून गेले आहे. लाखो वारकऱ्यांच्या उपस्थितीत भक्तीमय वातावरणात श्री विठ्ठल-रुक्मिणी मंदिरात राज्याचे मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस आणि त्यांच्या पत्नी अमृता फडणवीस यांच्या हस्ते शासकीय महापूजा पार पडली. यावेळी मुख्यमंत्र्यांनी महाराष्ट्राच्या अन्नदात्या बळीराजाच्या सुख, समृद्धी आणि संकटमुक्त जीवनासाठी विठ्ठल चरणी प्रार्थना केली.



आषाढी एकादशीच्या पावन सोहळ्यानिमित्त मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस आणि अमृता फडणवीस यांनी मानाचे वारकरी माने दांपत्य यांच्यासोबत विठ्ठल-रुक्मिणीची शोडशोपचार पद्धतीने विधिवत महापूजा केली. यावेळी विठ्ठल आणि रुक्मिणी मातेला विशेष डिझायनर पोशाख अर्पण करण्यात आला. राज्याच्या प्रगतीसह शेतकरी, वारकरी आणि सर्वसामान्य नागरिकांच्या कल्याणासाठी मुख्यमंत्र्यांनी विठ्ठल चरणी साकडे घातले.

दरम्यान, पंढरपुरातील संत ज्ञानेश्वर महाराज संस्थान पादुका मंदिराच्या नव्या भक्त निवासाचे भूमिपूजन मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्या हस्ते पार पडले. यावेळी ग्रामविकास मंत्री जयकुमार गोरे उपस्थित होते.

# सलग 20 वर्षे वारीचं फळ! धाराशिवच्या माने दाम्पत्याला विठुरायाच्या महापूजेचा मान

**पंढरपूर :** आषाढी एकादशी निमित्त पंढरपूर येथे लाखो वारकऱ्यांच्या उपस्थितीत विठ्ठल-रुक्मिणीची शासकीय महापूजा मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस आणि अमृता फडणवीस यांच्या हस्ते संपन्न झाली. दरवर्षीप्रमाणे यंदाही मंदिरातील दर्शन रांगेतील पहिल्या निष्ठावंत वारकरी दाम्पत्याला मानाच्या वारकऱ्याचा बहुमान देण्यात आला. यंदा हा सन्मान धाराशिव जिल्ह्यातील बाबासाहेब माधव माने आणि प्रभावती बाबासाहेब माने या दाम्पत्याला मिळाला.



धाराशिव जिल्ह्यातील कळंब तालुक्यातील गौरगाव येथील बाबासाहेब आणि प्रभावती माने हे शेती व्यवसाय करतात. गेल्या सलग २० वर्षांपासून ते मनोभावे पंढरीची वारी करत आहेत. त्यांच्या कुटुंबातील ही वारीची तिसरी पिढी असून विठ्ठल भक्तीची परंपरा त्यांनी जपली आहे.

महापूजेचा मान मिळाल्यानंतर बोलताना माने दाम्पत्याने आनंद व्यक्त केला. "आम्ही २० वर्षांपासून वारी करत आहोत. आमच्या कुटुंबात वारी करणारी ही तिसरी पिढी आहे. मानाचे वारकरी होण्याचा सन्मान मिळेल, असे स्वप्नातही वाटले नव्हते. विठुरायाच्या महापूजेचा मान मिळाल्याने आयुष्य कृतार्थ झाले," अशी भावना त्यांनी व्यक्त केली.

बाबासाहेब आणि प्रभावती माने यांना एक मुलगा, चार मुली आणि आठ नातवंडे असा मोठा परिवार आहे. सलग दोन दशकांच्या अखंड वारीमुळे (Pilgrimage) त्यांना यंदा विठुरायाच्या महापूजेचा मान मिळाला. यावेळी मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्या हस्ते त्यांचा सत्कार करण्यात आला. तसेच महाराष्ट्र राज्य मार्ग परिवहन महामंडळ (MSRTC) कडून त्यांना एक वर्षासाठी मोफत प्रवास पासही प्रदान करण्यात आला.

## उत्तर प्रदेशमध्ये मोठा रेल्वे अपघात टळला, मालगाडीचे सात डबे रुळावरून घसरले

**उत्तर प्रदेश :** उत्तर प्रदेशमधील अमेठी परिसरात एक मोठा रेल्वे अपघात टळला. पहाटे ५ वाजण्याच्या सुमारास सिंदुरवा रेल्वे स्थानकाजवळ मालगाडीचे सात डबे रुळावरून घसरले. स्थानकाजवळ असलेल्या इंदोरामा खत युनिटच्या सायडिंगवर खत वाहून नेणाऱ्या मालगाडीचे सात डबे रुळावरून घसरले. सुदैवाने, कोणताही डबा उलटला नाही आणि चालकाने तात्काळ गाडी थांबवल्यामुळे जीवितहानी टळली. मालगाडीचे सात डबे रुळावरून घसरल्याची माहिती मिळताच, रेल्वेचे अभियांत्रिकी, परिचालन विभाग आणि रेल्वे संरक्षण दलाचे (RPF) पथक तात्काळ घटनास्थळी पोहोचले.

## राज्य राखीव पोलीस बलाच्या (SRPF) जवानाची आषाढी वारी बंदोबस्तादरम्यान आत्महत्येची दुर्दैवी घटना

हिंदू प्रकाशवार्ता प्रतिनिधी

**छत्रपती संभाजीनगर :** पंढरपूर आषाढी वारीच्या बंदोबस्तासाठी गेलेल्या राज्य राखीव पोलीस बल (SRPF) गट क्रमांक १४, सातारा कॅम्प, छत्रपती संभाजीनगर येथील एका जवानाने स्वतःच्या शासकीय रायफलमधून गोळी झाडून आत्महत्या केल्याची अत्यंत दुर्दैवी घटना उघडकीस आली आहे. २५ जुलै रोजी रात्री दोन वाजेच्या सुमारास ही घटना घडली. संबंधित जवान हा मूळचा परभणी जिल्ह्यातील रहिवासी होता. या दुर्दैवी घटनेमुळे पोलीस दलात आणि मृत जवानाच्या कुटुंबात शोककळा पसरली आहे. पोलिसांच्या अतिताणामुळे घडलेली ही पहिलीच घटना नाही.



सलग बंदोबस्त, दीर्घ कामाचे तास, सततचा मानसिक ताण, कौटुंबिक जबाबदाऱ्या पार पाडण्यातयेणाऱ्या अडचणी, अपुरी विश्रांती आणि कामाचा वाढता ताण यांसारख्या अनेक गंभीर समस्या पोलीस जवानांना भेडसावत असतात. या बाबींचा सखोल आढावा घेऊन वेळीच उपाययोजना करण्याची गरज पुन्हा एकदा अधोरेखित झाली आहे. प्रत्येक अशा प्रकारच्या दुःखद घटनेनंतर केवळ शोक व्यक्त करून थांबणे प्रशासनाला परवडणारे नाही.

अशा प्रकारच्या टोकाच्या घटनांना आळा घालण्यासाठी आणि जवानांचे प्राण वाचवण्यासाठी प्रशासनाने तातडीने पावले उचलणे गरजेचे बनले आहे. जवानांमधील नैराश्य दूर करण्यासाठी नियमित समुपदेशन सत्रे आयोजित करणे, ड्युटीचे तास मर्यादित करणे, जवानांना पुरेशा विश्रांतीची संधी उपलब्ध करून देणे आणि त्यांच्या अडीअडचणी समजून घेण्यासाठी संवेदनशील यंत्रणा उभी करणे अत्यंत आवश्यक आहे. एका कर्तव्यदक्ष जवानाचा अशा प्रकारे जीव जाणे ही केवळ एका कुटुंबाची कधीही भरून न निघणारी हानी नसून, संपूर्ण पोलीस दलासाठी चिंतेची आणि आत्मपरीक्षणाची गंभीर बाब बनली आहे.

# अजिंठा घाटात ब्रेक निकामी झालेल्या ट्रकने तोडले लोखंडी कठडे

## 500 फूट दरीत कोसळण्यापूर्वीच चिखलात रुतला, मोठा अनर्थ टळला!

**फर्दापूर प्रतिनिधी :** छत्रपती संभाजीनगर - जळगाव महामार्गावरील अजिंठा घाटात शनिवारी संध्याकाळी एक काळजाचा ठोका चुकवणारी घटना घडली. जालना येथून सुरतकडे लोखंड घेऊन जाणाऱ्या एका अवजड ट्रकचे ब्रेक अचानक निकामी झाले. नियंत्रणाबाहेर गेलेला हा ट्रक थेट लोखंडी सुरक्षा कठडे तोडून दरीच्या दिशेने घुसला, मात्र सुदैवाने मातीत फसल्याने जागेवरच थांबला. अवघ्या ३० फुटांच्या अंतराने ५०० फूट खोल दरीत कोसळण्यापासून हा ट्रक वाचल्याने एक भयंकर अनर्थ टळला आहे.

**घाटात अचानक फेल झाले ब्रेक:** शनिवारी संध्याकाळी साडेपाच वाजेच्या सुमारास जालना येथून सुरतकडे लोखंडी साहित्याची वाहतूक करणारा ट्रक (क्रमांक GJ 18 BY 1054) अजिंठा घाट उतरत होता. घाटातील 'घोडी पटांगण' वळणावर असताना अचानक ट्रकचे ब्रेक निकामी झाले. उतारावर असल्याने ट्रकचा वेग प्रचंड होता आणि चालकाचे गाडीवरील नियंत्रण पूर्णपणे सुटले.



वेगात असलेल्या या ट्रकने रस्त्याच्या कडेला असलेले लोखंडी सुरक्षा कठडे (साईड पट्ट्या) धडक देऊन तोडले आणि ट्रक थेट कच्च्या रस्त्यावरून दरीच्या दिशेने खाली गेला. मात्र, सुदैवाने तिथे असलेल्या माती आणि चिखलात या अवजड ट्रकची चाके रुतली आणि ट्रक जागेवरच थांबला. जर हा ट्रक आणखी फक्त ३० फूट पुढे गेला असता, तर तो थेट ५०० फूट खोल दरीत कोसळला असता आणि वाहनाचा अक्षरशः चुराडा झाला असता.

**चालकाने मारली चालत्या ट्रकमधून उडी:** ट्रकचे ब्रेक फेल झाल्याचे लक्षात येताच आणि गाडी दरीच्या दिशेने जात असल्याचे पाहून, प्रसंगावधान राखत ट्रक चालक आणि क्लिनर (मदतनीस) यांनी चालत्या गाडीतून थेट खाली उड्या मारल्या. यामुळे सुदैवाने कोणतीही जीवितहानी झाली नाही आणि दोघांचेही प्राण थोडक्यात बचावले.

घटनेची माहिती मिळताच फर्दापूर पोलीस ठाण्याचे कर्मचारी आकाश गवळे आणि स्वप्नील चव्हाण यांनी तातडीने घटनास्थळी धाव घेतली. त्यांनी भयभीत झालेल्या चालक आणि क्लिनरला धीर दिला, त्यांची विचारपूस केली आणि ट्रकला सुरक्षितपणे बाहेर काढण्यासाठी तत्काळ मेकॅनिकला पाचारण केले.

अजिंठा घाटातील हा वळणदार रस्ता नेहमीच अपघातांना निमंत्रण देणारा ठरला आहे. मात्र, शनिवारी निसर्गाचीच कृपा म्हणावी की चिखलात ट्रक रुतल्याने दोन जीव वाचले आणि मोठी जीवितहानी टळली.

## "शाल जोडे"




# उपवासाला दरवाढीची फोडणी.. इंधन दरवाढीचा परिणाम.. साखर. शेंगदाणे. डाळीतही कमी.. अधिक भाव वाढ..

हिंदू प्रकाश वार्ता प्रतिनिधी

**परभणी :** आषाढी एकादशी निमित्त शहर परिसरात. साबुदाणा. आगरीची आवक लक्षणीय प्रमाणात झाली असली तरी यंदा दोन्हीमध्ये कमी अधिक दर वाढ झाल्याचे दिसून येत आहे. त्याचवेळी साखर. शेंगदाणे. खाद्य तेल व इतर वस्तूंमध्ये ही भाव वाढ झाल्याचे समोर येत आहे. आज एकच मागच्या वर्षीच्या तुलनेत यंदाचा उपवास थोडा माहागच असल्याची चिन्हे आहेत.

आषाढीच्या पार्श्वभूमीवर शहर परिसरात सुमारे 200 टन साबुदाण्याची आवक झाली आहे व किलोमागे चार ते पाच रुपये दर वाढ झाल्यामुळे सध्या साबुदाणा 65 ते.75 रुपये किलोच्या घरात पोहोचला आहे. त्याचवेळी भगरीची शहरात सुमारे दहा टन आवक झाली आहे व आता भगरीचे भाव.150.ते.300. रुपयांपर्यंत पर्यंत पोहोचले आहेत. विशेष म्हणजे मागच्या वर्षीच्या तुलनेत भगरीत साधारण.50. रुपये किलो पर्यंत दर वाढ झाल्याचे सांगण्यात आले. आणखी उल्लेखनीय म्हणजे वरई भगरीचे उत्पादन घटले आहे व त्याचाही परिणाम दर वाढीवर झाल्याचे सांगण्यात आले. पुन्हा उपवास पदार्थांमध्ये मोठ्या प्रमाणावर वापरण्यात येणाऱ्या शेंगदाण्याचे किलोमागे दोन रुपये दर वाढ झाल्याने शेंगदाण्याचे घाऊक भाऊ आता.130.ते.150. रुपयापर्यंत पोहोचले आहेत. तसेच साखरेत किलोमागे चार रुपये दरवाढ होऊन आता साखर 49 रुपयांवर पोहोचली आहे. खाद्यतेलातही किरकोळ दरवाढ झाल्याचे स्पष्ट झाले आहे. सोयाबीन तेलात लिटर मागे दोन रुपयांची दरवाढ होऊन हे.तेल.150. रुपये सूर्यफूल तेलातही दोन रुपयांची दर वाढ होऊन हे तेल 170 रुपये. शेंगदाणा तेलात दोन रुपये दरवाढ होऊन आता शेंगदाणा तेल 185 ते 190 रुपयावर पोहोचले आहे. करडी तेलात मागेच घडलेले दर स्थिर आहेत व सद्यस्थितीत करडी तेल 260 रुपयांच्या घरात आहे. उपवासाचे दिवस वगळता विविध डाळींना बारा महिने मागणी असते व बहुतेक डाळीमध्येही किरकोळ दरवाढ झाल्याचे स्पष्ट झाले आहे. त्याचाच परिणाम म्हणून तूरडाळीत किलोमागे एक रुपयांची दरवाढ होऊन 110 रुपये हरभरा डाळीत तीन रुपये दरवाढ होऊन.77.ते.80. रुपये मुग डाळीत दोन रुपये दरवाढ होऊन 97 ते 105 रुपये. मसूर डाळीत एक.रुपये दरवाढ होऊन.75.ते.80. रुपये तर उडीद डाळीत पाच रुपये दरवाढ होऊन.125.ते.150. रुपयांवर घाऊक भाव पोहोचले आहेत....

इंधन दरवाढीमुळे साबुदाण्यात तर कमी उत्पादनामुळे भगरीत दरवाढ झाली आहे. त्यातही भगरीतील दरवाढ जास्त आहे. मात्र दोन्ही वस्तूंची आवक आषाढीच्या पार्श्वभूमीवर लक्षणीय प्रमाणात झाली आहे.....

।। रताळी.100.रुपये किलो।।

आपल्याकडे बटाटे व रताळीचा उपवास पदार्थामध्ये मोठा वापर होतो त्यातही रताळींना या दिवसांत चांगलीच मागणी असते. मात्र शुक्रवारी याच रताळीची 100 रुपये किलोपर्यंत किरकोळ विक्री झाल्याचे स्पष्ट झाले. त्यामुळे प्रत्यक्ष आषाढीच्या दिवशी म्हणजेच शनिवारी एवढाच भाव राहणार की काय अशीही शंका घेतली जात आहे.

# सं पा द की य

## परीक्षा व्यवस्थेतील उत्तरदायित्व आणि शिक्षण क्षेत्रापुढील नवी आव्हाने

देशभरातील लाखो विद्यार्थ्यांच्या भवितव्याशी निगडित असलेल्या नीट-यूजी परीक्षा गैरप्रकार प्रकरणी निर्माण झालेल्या तीव्र असंतोषाच्या पार्श्वभूमीवर, केंद्रीय शिक्षणमंत्री धर्मेंद्र प्रधान यांनी दिलेला राजीनामा आणि राष्ट्रपतींनी तो स्वीकारणे, हा देशाच्या प्रशासकीय पटलावरील एक अत्यंत महत्त्वाचा घडामोडींचा टप्पा आहे. राष्ट्रीय स्तरावरील महत्त्वाच्या परीक्षांमधील पेपर लीकच्या घटनांमुळे विद्यार्थ्यांच्या आणि पालकांच्या मनात निर्माण झालेला अविश्वास दूर करण्यासाठी सरकारने उचललेले हे पाऊल नैतिक उत्तरदायित्वाची साक्ष देणारे आहे. आता प्रल्हाद जोशी यांच्याकडे शिक्षण मंत्रालयाचा अतिरिक्त कार्यभार सोपवण्यात आला असून, ढासळलेली परीक्षा व्यवस्था पुन्हा रुळावर आणणे आणि विद्यार्थ्यांचा विश्वास संपादन करणे हे त्यांच्यापुढील सर्वात मोठे आव्हान असणार आहे. माजी शिक्षणमंत्र्यांनी आपल्या राजीनाम्यात नमूद केल्याप्रमाणे, हा प्रश्न वैयक्तिक प्रतिष्ठेपेक्षा देशाच्या युवाशक्तीच्या भविष्याशी जोडलेला होता. राष्ट्रीय परीक्षा एजन्सीमधील (NTA) ४७ कर्मचाऱ्यांना तातडीने बडतर्फ करणे आणि पेपरफुटी प्रकरणाच्या जलद सुनावणीसाठी 'फास्ट ट्रॅक कोर्ट' स्थापन करण्याची प्रक्रिया वेगाने सुरू करणे, हे सरकारचे निर्णय विद्यार्थ्यांच्या आंदोलनाची योग्य दखल घेतल्याचे दर्शवतात. प्रशासनाने दाखवलेल्या या कठोर आणि पारदर्शक भूमिकेमुळेच आंदोलकांनी आपले उपोषण मागे घेतले आहे, ही लोकशाही मार्गाने दिलेल्या लढ्याची आणि प्रशासकीय संवेदनशीलतेची मोठी यशोगाथा आहे. मात्र, केवळ मंत्र्यांचा राजीनामा किंवा कर्मचाऱ्यांची हकालपट्टी करून हा प्रश्न मुळापासून संपणारा नाही. स्पर्धा परीक्षा घेणाऱ्या सर्वच यंत्रणांच्या कार्यपद्धतीचे पुनरावलोकन करणे आणि तंत्रज्ञानाचा वापर करून पेपर लीक होण्याच्या सर्व शक्यता पूर्णपणे बंद करणे गरजेचे आहे. नव्या शिक्षण नेतृत्वाने केवळ तात्पुरती मलमपट्टी न करता, परीक्षा प्रक्रियेतील राजकीय व प्रशासकीय हस्तक्षेप पूर्णपणे थांबवून एक मजबूत, पारदर्शक आणि निर्दोष व्यवस्था निर्माण केली पाहिजे. तरच देशातील कष्टकरी विद्यार्थ्यांना त्यांच्या गुणवत्तेनुसार न्याय मिळेल आणि युवाशक्तीचा देशाच्या विकासावरील विश्वास कायम राहील.

# ...म्हणून तरुण दुर्लक्षित करायचे नसतात.!

तरुण हा देशाचा कणा आहे आणि तुम्ही त्या कण्याकडेच जर दुर्लक्ष करत असाल आणि तोच कणा जर मोडून पडला तर राष्ट्र म्हणून हे कधीही योग्य ठरत नाही. दिल्लीतील जंतर-मंतर वरील आंदोलन हे या कण्याचंच होतं. पुढे लिहीत असताना आणि बोलत असताना मी एक बाब या ठिकाणी स्पष्टपणे नोंदवू इच्छितो, मी या जंतर-मंतर वरील आंदोलनाचा बिल्कुल ही समर्थक नव्हतो. आंदोलनामध्ये विद्यार्थी वगळता सहभागी होणारी मंडळी, आंदोलनाची वेळोवेळी बदललेली दिशा, आंदोलकांनी घेतलेली भूमिका, आंदोलनाचे बदलत नेतृत्व, आंदोलनाचे बदलते नारे, आंदोलना मागचं वास्तव, आंदोलना मागचे चेहरे, आंदोलनाला येणारा पाठिंबा, आंदोलनातून चालणारे राजकारण, आंदोलनातून चालणारा आर्थिक व्यवहार, आंदोलनातून चालणारे राष्ट्रविरोधी विचार, आंदोलनात भारतीय मीडियाची केलेले हेतूपुरस्सर बदनामी, भारतीय प्रिंट मीडियाची केलीले हेतूपुरस्सर बदनामी. त्यातच विदेशी पत्रकार मंडळींना तिथं मिळणारं अभय, विदेशी पत्रकारांचे एजंट याला दिलेलं मोकळेपणा, त्यातून विदेशी शक्तीची त्यात झालेली सहभागिता, आणि ह्याचा पुरावा म्हणजे आंदोलन स्थगिती नंतर झालेल्या सिजेपीच्या पत्रकार परिषदेत त्यांच्या प्रवक्त्यांनी स्वतः सांगितल आहे की "आंदोलनात काही देशविरोधी शक्ती सहभागी झाल्या होत्या" या सर्व विषयामुळे मी आंदोलनाचा समर्थक मुळीच नव्हतो. परंतु त्या आंदोलनामध्ये प्रामाणिक विद्यार्थ्यांनी दिलेल पूर्ण आणि प्रचंड योगदान, विद्यार्थ्यांनी निर्माण केलेली क्षमता, विद्यार्थ्यांनी कायमस्वरूपी दाखवलेली एकजूटता आणि त्यातूनच परिणामी त्यांना पाहिजेत असलेला केंद्रीय मंत्र्यांचा राजीनामा घेऊन केंद्र सरकारने घेतली लवचिक भूमिका, या भूमिकेमुळं तरुणांनी केलेल्या आंदोलनाला ते मिळालेलं यश ह्याचा अर्थ असा आहे की भारतातील तरुणांना तुम्ही दुर्लक्षित करू शकत नाही. भारतीय तरुणांना दुर्लक्षित करू शकत नाही हेच या लेखा मागचा विशेष आणि मुख्य हेतू आहे. भारतातील तरुणांना दुर्लक्षित करू शकत नाही, इतकं जरी सरकारने लक्षात घेतलं तरी सुद्धा भारत पुढील दशकामध्ये याच तरुणांच्या भरवशावर दैदीप्यमान वैभव निर्माण करू शकतो. तरुणांच्या दिशा अनेक वेळा भरकटलेल्या असतात हे लक्षात घेऊन, त्यांना योग्य दिशा दाखवण्याचं काम हे सरकारचं आहे. सरकार याच्यातून पळ काढू शकत नाही हे या आंदोलनाने सिद्ध केलेला आहे. काही गोष्टी भारत म्हणून जरी योग्य झाल्या नसतील तरी तरुणांनी दाखवलेली एकजूटता आणि त्यांच्या एकजुटीला मिळालेल यशच म्हणावं लागेल, याला मान्यच करावं लागेल. आज पर्यंतच्या भारताच्या आणि महाराष्ट्राच्या सामाजिक, सांस्कृतिक, भौगोलिक, राजकीय, आर्थिक विषयांमध्ये तरुण विद्यार्थ्यांनी जेव्हा जेव्हा सहभाग नोंदवला. तेव्हा तेव्हा या देशाचा आर्थिक भार, सामाजिक अभिसरण, राष्ट्रीय कर्तव्य आणि राजकीय परिणाम हे निश्चितच वेगवेगळे पाहायला मिळालेले आहेत. आपल्या देशाच्या एकूण लोकसंख्येपैकी सर्वात जास्त लोकसंख्या ही तरुणांची आहे. आणि म्हणून हा तरुण भारताचा कणा आहे. यांना दुर्लक्षित करून चालणार नाही, हे सरकारने सदैव लक्षात ठेवावा. भारताला आणि महाराष्ट्राला आंदोलनांची प्रचंड मोठी परंपरा आणि त्या आंदोलनातून या देशाने दिशा बदललेली आहे हा इतिहास आहे हे ही सरकारने लक्षात घेतलं पाहिजे...

स्वातंत्र्यपूर्व काळामध्ये या देशाला ब्रिटिश राजवटीने कंटाळून सोडले होते. हे सर्वांना माहीत आहे तेव्हा छोडो इंडिया चळवळ 1942 मध्ये राष्ट्रपिता महात्मा गांधींनी त्याचे आवाहन केलं होतं. 1942 च्या लढ्यामध्ये प्रचंड मोठ्या प्रमाणामध्ये विद्यार्थी होते आणि प्रचंड मोठ्या प्रमाणामध्ये तरुण सुद्धा होते तो ऐतिहासिक 1942 च्या लढा हा देशाच्या तरुणांनी दिल्यामुळे देशाला स्वातंत्र्य लवकर मिळालं हा इतिहास आहे. 1965 मध्ये तमिळनाडूमध्ये हिंदी विरुद्ध आंदोलन तरुणांनी उभं केलं होतं. अनेकांना त्या काळात त्या आंदोलन पचनी पडलं नव्हतं तरी तरुणांनी त्या आंदोलन यशस्वी करून दाखवलं आणि ते आंदोलन ऐतिहासिक ठरलं हे महत्त्वाचं. 1974 ला तरुणांचे गुजरातमधलं नवनिर्माण आंदोलन झालं कॉलेज, हॉस्टेल्स आणि मेस, आणि फीस वाढ ह्या विरोधात त्या आंदोलन होतं ते आंदोलन इतक्या मोठ्या प्रमाणावर त्याला यश आलं की गुजरात मध्ये सत्तांतर झालं त्या काळात काँग्रेसला मुख्यमंत्री बदलावा लागला ही शक्ती तरुणांची आहे. 1974 मध्ये जयप्रकाश नारायण यांनी विद्यार्थ्यांचा आंदोलन हातात घेतलं आपल्याला माहित आहे 1974 च्या आंदोलनाने परत एकदा देशाची दिशा स्पष्टपणे बदलली. जनता पक्षाच्या त्या आंदोलनाला प्रचंड यश हे भारतीय तरुणांनी दिलं हे विसरून कसं चालेल. जयप्रकाश नारायण नावाचा त्या काळातला पंच्यात्तरी पार केलेला, एक वृद्ध व्यक्ती यांच्या आवाहनाला भारतातल्या तरुणांनी साद दिली आणि भारताचा सामाजिक, राजकीय इतिहास बदलला तो आपण पाहिलेला आहे. हेच आंदोलन आणीबाणीची पार्श्वभूमी ठरलं हेही लक्षात घेतलं पाहिजे ते स्वतंत्र इतिहास आहे. पण तरुणांनी निर्माण केला होता. त्यानंतर मंडळ आयोग आंदोलन 1990 च्या आंदोलनातही सर्वात जास्त विद्यार्थ्यां आणि तरुणच रस्त्यावर होतो. आपल्या सर्वांना आठवतच 2012 चा निर्भया आंदोलन त्या आंदोलनातही 35 च्या आतला तरुण आणि विद्यार्थी वर्ग सहभागी होता त्यांनीही योग्य तो न्याय त्या निर्भयाला मिळवून दिला आहे इतिहास आहे. 1960 ला महाराष्ट्र स्वतंत्र झाला संयुक्त महाराष्ट्राचा लढा म्हणून ते आंदोलन भारतामध्ये प्रसिद्ध आहे त्या लढ्यातही सर्वात जास्त तरुण आणि विद्यार्थी सहभागी होते आणि त्या सहभागानेच पंतप्रधान पंडित नेहरूंना सुद्धा आपला निर्णय मागे घ्यावा लागला. आणि संयुक्त महाराष्ट्रातून स्वतंत्र महाराष्ट्र अस्तित्वात अनावा लागला. विद्यार्थ्यांच्या आणि तरुणांच्या आंदोलनाचा तेही एक दैदीप्यमान यशस होतं. महाराष्ट्रामध्ये ऐंशीच्या दशकामध्ये शेतकरी संघटनेच्या माध्यमातून शरद जोशी नावाच्या एका प्रौढ व्यक्तीने, तरुण शेतकऱ्यांना आवाहन दिलं होतं. त्याही दशकामध्ये लाखोंच्या संख्येने तरुण शेतकरी रस्त्यावर उतरला आणि महाराष्ट्राच्या राजकारणाची दिशा बदलली. 1970 ला दलित पँथरणे सुरू केलेला नामांतर लढा हा महाराष्ट्रातील विद्यार्थ्यांनी आणि तरुणांनीच उभा केलेला लढा होता प्रचंड संघर्ष त्या काळात करावा लागला 1970 ला सुरू झालेला लढा 14 जानेवारी 1994 ला थांबला शेवटी सरकारला नामविस्ताराचा निर्णय घेऊन ऐतिहासिक नामांतर घडून आणले तरुणांनी घेतलेल्या लढ्याचं तेही एक यशस होतं. अगदी अलीकडील मराठा आरक्षणाचे, धनगर आरक्षण असेल ह्यातही तरुणच समोर होता. त्यामुळेच ही आंदोलन दखलपात्र ठरली. अनेक वेळा काही आंदोलनांची दखल ही राज्याला आणि देशाला धोका होऊ शकतो, त्यामागची पार्श्वभूमी लक्षात घेऊनही दखलपात्र ठरतात, परंतु ज्या आंदोलनामध्ये तरुण असतात, विद्यार्थी असतात त्या आंदोलनाची दखल कोणत्याही कारणाने सरकारला घ्यावीच लागते हा महत्त्वाचा बिंदू आपण लक्षात घेतला पाहिजे...

तरुण या देशातील सगळ्यात मोठी शक्ती आहे आणि शक्ती मोठी झाली की त्या शक्तीची धार बोथट करण्याचे खोटे प्रयत्न देखील काही देश विरोधी शक्तिकडून होत असतात. ती शक्ती लक्षात घेऊन त्या शक्तीला एकजूट करण्यासाठी सरकारने आणि समाजाने योग्य ते प्रयत्न केले पाहिजेत. तरुणांचे रक्त गरम असते, तरुणांकडे प्रचंड बुद्धिमत्ता असते, परंतु त्या बुद्धीला अनुभवाची धार कमी असते आणि अनुभव नसल्याकारणाने विषय थोडा भरकटू शकतो अशी स्थिती असते. तरुणांची दिशा भटकू नये यासाठी सरकारने आणि समाजाने काळजी घेतली तर हाच भारतीय तरुण ज्याचा इतिहास वैभव संपन्न आहे, तोच परत इतिहास निश्चितच निर्माण करू शकतो. छत्रपती शिवाजी महाराज, छत्रपती संभाजी महाराज, स्वामी विवेकानंद, स्वातंत्र्यवीर सावरकर डॉक्टर बाबासाहेब आंबेडकर, लचित बारकुफन, भगतसिंग, अण्णाभाऊ साठे ही राष्ट्रभक्त मंडळी या देशातल्या तरुणांचा आदर्श झाला आणि हाच आदर्श पाठ्यपुस्तकाच्या माध्यमातून सरकारने समाजासमोर, विद्यार्थ्यांसमोर आणला तर हा देश निश्चितपणे परम वैभव संपन्नत कडे नक्की जाईल यात शंका नाही आणि सरकार तरुणांना विद्यार्थ्यांना कमी न समजता, योग्य ती दिशा देण्याचं काम करेल असाही विश्वास या राजीनाम्याच्या माध्यमातून वाटतो...

**- विशाल वसंतराव मुळे आजेगांवकर.**

## ...सोप्याकडून कठीणाकडे...

दरवर्षी शैक्षणिक वर्षाच्या सुरुवातीला जुलै ऑगस्ट महिन्यात बोर्ड पुढील वर्षीच्या फेब्रुवारी मार्च महिन्यात होणाऱ्या दहावी आणि बारावी बोर्ड परीक्षेचे संभाव्य वेळापत्रक जाहीर करीत असते. त्यामुळे यंदा बोर्डाच्या संभाव्य वेळापत्रकात दहावी बोर्ड परीक्षेच्या वेळापत्रकातील प्रथम भाषा मराठी विषयाच्या पेपरचा क्रम बदलायला हवा. त्यामुळे नक्कीच प्रथम भाषा मराठी विषयाचा निकाल वाढण्यात आणि एकूणच उत्तीर्णांची संख्या वाढण्यात मदत होईल.

यंदा महाराष्ट्र राज्य मंडळाच्या दहावी बोर्ड परीक्षेत मराठी विषयात नापास झालेल्या विद्यार्थ्यांची संख्या मोठी आहे. या.वर्षी फेब्रुवारी मार्च 2026 मध्ये झालेल्या दहावी बोर्ड परीक्षेत प्रथम भाषा मराठी असलेल्या आणि प्रविष्ट झालेल्या विद्यार्थ्यांची संख्या दहा लाख 87 हजार 699 इतकी होती. तर पास झालेल्या विद्यार्थ्यांची संख्या दहा लाख सहा हजार 896 इतकी आहे. मराठी माध्यमाच्या शाळेत.80. हजार 803 विद्यार्थी नापास झाले आहे तर इतर म्हणजेच इंग्रजी. उर्दू आदी माध्यमांत शिक्षण घेणारे व ज्या विद्यार्थ्यांनी द्वतीय किंवा तृतीय भाषा म्हणून मराठी घेतला आहे ते.13. हजार 741 विद्यार्थी मराठी विषयात नापास झाले आहेत. असे दोन्ही मिळून एकूण 94 हजार 544 विद्यार्थी मराठी विषयात नापास झाले आहेत.

वरील.80. हजार 803. विद्यार्थी हे मराठी माध्यमाच्या शाळेत शिक्षण घेणारे व प्रथम भाषा मराठी विषय असणारे विद्यार्थी आहेत. प्रथम भाषा मराठी विषयात इतक्या मोठ्या प्रमाणावर विद्यार्थी का नापास झाले.?. याची वेगवेगळी कारणे आहेत. सरकार शिक्षण संस्था. शिक्षक. मराठी भाषाप्रेमी मंडळी यावर चिंतन करीत असून त्यातून नक्कीच काही सकारात्मक बदल अपेक्षित आहेत.

इयत्ता दहावीच्या बोर्ड परीक्षेतील मराठी विषयाचा निकाल उंचावण्यासाठी काही उपाय सहज करता येणे शक्य आहे. ते काळजीपूर्वक व वेळेत करायला हवेत.

मुले मराठी नापास का झाली याची अनेक कारणे असली तरी एक महत्त्वाचे कारण असे की दहावी बोर्ड परीक्षेच्या वेळापत्रकात दरवर्षी प्रथम भाषा मराठी विषयाचा पेपर पहिला असतो. विद्यार्थ्यांवर बोर्डाच्या परीक्षेचे दडपण संपूर्ण वर्षभर असते. परीक्षा जसजशी जवळ येते तस तसा विद्यार्थ्यांवरील अभ्यास व परीक्षेचा ताण वाढत जातो. त्यात दहावी बोर्ड परीक्षेचे बहुतांश वेळा परीक्षा केंद्र दुसऱ्या शाळेत असते. आजोबांच्या शाळांची मुले ही परीक्षा केंद्रावर परीक्षेसाठी एकत्र असतात. केंद्राबाहेर पोलीस. सीसीटीव्ही कॅमेरे. परीक्षा केंद्रात प्रवेश करताना होणारी तपासणी. परीक्षा केंद्रावरील विद्यार्थी व शिक्षकांचे अनोळखी चेहरे हे सर्व दहावीच्या परीक्षेत पहिल्या पेपरच्या दिवशी विद्यार्थ्यांसाठी नवीन असते. किंबहुना तो त्यांचा पहिलाच अनुभव असतो. प्रत्यक्ष आणि अप्रत्यक्ष या सर्वांचा तान विद्यार्थ्यांच्या चेहऱ्यावर जाणवत असतो. याचा परिणाम विद्यार्थ्यांच्या प्रथम भाषा मराठी विषयाच्या पेपर लेखनावर होण्याची शक्यता नाकारता येत नाही. मराठी विषयात नापास होणाऱ्या विद्यार्थ्यांची संख्या ही इतर विषयांच्या तुलनेत अधिक असते. दहावी प्रमाणे बारावी बोर्ड परीक्षेचे वेळापत्रक आणि निकालाचा संबंध आहे. बारावी परीक्षेत पहिला पेपर हा इंग्रजी विषयाचा असतो आणि बारावी परीक्षेत इंग्रजी विषयातच अनुत्तीर्णांची संख्या अधिक असते.

त्यामुळे राज्य मंडळांनी पहिल्याच दिवशी प्रथम भाषा मराठी विषयाचा पेपर ठेवण्याऐवजी दरवर्षीप्रमाणे वेगवेगळे विषय पहिल्या दिवशी ठेवायला हवेत. गणित. विज्ञान आणि सामाजिक शास्त्र. या विषयांचे प्रत्येकी दोन पेपर हे 40 गुणांसाठी असतात. यापैकी कोणताही पेपर पहिल्या दिवशी ठेवायला हवा. हा प्रयोग करणे बोर्डाला सहज शक्य आहे. यामुळे मराठी विषयाचा निकाल वाढण्यास काही प्रमाणात मदत होईल. गेल्या चार वर्षातील सीबीएसई बोर्डाच्या दहावी परीक्षेच्या वेळापत्रकाचा अभ्यास केला तर असे लक्षात आले की सीबीएसई दरवर्षी दहावी बोर्ड परीक्षेच्या वेळापत्रकात वेगवेगळा विषय पहिल्या दिवशी ठेवते. मार्च 2023 च्या परीक्षेत सीबीएसई बोर्डाने वैकल्पिक पेंटिंगसारखे विषय परीक्षेत पहिल्या दिवशी ठेवले होते. तर मार्च 2024 मध्येही वैकल्पिक विषयच बोर्डाने आधी ठेवले होते. फेब्रुवारी 2025 परीक्षेत इंग्रजी आणि फेब्रुवारी 2020 च्या परीक्षेत गणित विषयाची परीक्षा पहिल्या दिवशी घेण्यात आली. त्यामुळे राज्य मंडळांनीही आपल्या दहावी बोर्ड वेळापत्रकात लवचिकता आणि नाविन्यता आणायला हवी. जगप्रसिद्ध शिक्षणतज्ज्ञ जॉन अमोस कोमेनियस याचे अध्यापन शास्त्राचे सोप्याकडून कठीणाकडे हे सूत्र राज्य मंडळांने परीक्षेचे वेळापत्रक निश्चित करताना विचारात घ्यायला हवे....

## भगवती विद्यालय बिडकीन येथे क्रांतिवीर लोकमान्य टिळक यांची जयंती साजरी



**बिडकीन :** भगवती विद्यालय, बिडकीन ता. पैठण जिल्हा छत्रपती संभाजी नगर येथे मतदाता जनजागृती व क्रांतिवीर लोकमान्य टिळक यांची दि २३ रोजी जयंती साजरी करण्यात आली .प्रस्तावना श्रीधर जऱ्हाड यांनी केली प्रथम विद्यालयाचे मुख्याध्यापक रायभान रक्तेसर यांनी लोकमान्य टिळक यांच्या प्रतिमेचे पूजन करून कार्यक्रमाची सुरवात केली विद्यार्थ्यांनां कार्यक्रमाचे अध्यक्ष कला महाविद्यालयाचे प्राचार्य डॉक्टर नितीन अहिरे, थिटे सर यांनी मतदाता जण जागृती विषयी प्रशालेतील विद्यार्थ्यांना मार्गदर्शन केले त्यानंतर मुख्याध्यापक यांनी टिलकांचे कार्यावर माहिती दिली. आभार रामनाथ धनवे सर यांनी मानले यावेळी ११६ विद्यार्थी सहभागी झाले होते कार्यक्रम यशस्वी करण्यासाठी कमलाकर काळे , सुनील पवार, श्रीमती विश्रांती सलगरे, सुभाष राठोड, आशुतोष झारगड यांनी सहकार्य केले, पसायदानणे कार्यक्रमाची सांगता करण्यात आली

## जिल्हा परिषद शाळा आमसरीत भक्तिरसात रंगला चिमुकल्यांचा वारकरी दिंडी सोहळा



**अजींठा प्रतिनिधी :** सिल्लोड तालुक्यातील अमसरी येथील दिनांक २४ जुलै रोजी जिल्हा परिषद प्राथमिक शाळा आमसरी येथे विठुरायाच्या भक्तीत रंगलेला 'चिमुकल्यांचा वारकरी दिंडी सोहळा' अत्यंत आनंदात आणि भक्तिमय वातावरणात पार पडला. टाळ-मृदंगाचा गजर, विठ्ठल-रुक्माईचा जयघोष आणि गवळणींच्या तालावर चिमुकल्या वारकऱ्यांनी काढलेल्या या दिंडीने संपूर्ण गाव विठ्ठलमय झाले होते.

या सोहळ्यानिमित्त विद्यार्थ्यांनी पारंपरिक वारकरी वेशभूषा धारण केली होती. मुलांच्या हातात पताका, टाळ आणि डोक्यावर तुळशीवृंदावण घेऊन निघालेल्या दिंडीने गावकऱ्यांचे लक्ष वेधून घेतले. गावातून भव्य मिरवणूक काढल्यानंतर शाळेच्या प्रांगणात विठुरायाच्या गाण्यांवर विद्यार्थ्यांनी मनमोहक नृत्य सादर केले. याप्रसंगी विद्यार्थी, शिक्षक आणि गावकऱ्यांनी फेर धरत फुगड्यांचा मनमुराद आनंद लुटला.

या भक्तिमय उपक्रमात शालेय व्यवस्थापन समितीच्या अध्यक्षा सुवर्णाताई पाडळे यांच्यासह गावकरी मंडळींनी उत्स्फूर्त सहभाग नोंदवून चिमुकल्या वारकऱ्यांचे कौतुक केले.

कार्यक्रमाच्या यशस्वी आयोजनासाठी शाळेचे मुख्याध्यापक श्री. खराटे सर, चांद सर, बोरकर सर, खेडेकर सर, चिकटे सर, सौ. योगिता भुषण पाटील मॅडम आणि काटकर मॅडम यांनी विशेष परिश्रम घेतले. संपूर्ण आमसरी ग्रामस्थांच्या सहकार्याने हा वारकरी दिंडी सोहळा मोठ्या उत्साहात व नयनरम्य वातावरणात संपन्न झाला.

## जीएमसीत बालरोग विषयातील ज्ञानाची चुरस; विभागीय प्रश्नमंजुषा स्पर्धेला उत्स्फूर्त प्रतिसाद

हिंदू प्रकाशवार्ता प्रतिनिधी

**छत्रपती संभाजीनगर :** शासकीय वैद्यकीय महाविद्यालय (जीएमसी), छत्रपती संभाजीनगर येथे बालरोगशास्त्रातील पदव्युत्तर विद्यार्थ्यांच्या ज्ञानाला चालना देणारी २० वी आयएपी पदव्युत्तर बालरोग प्रश्नमंजुषा स्पर्धा – विभागीय फेरी २०२६ उत्साहपूर्ण वातावरणात पार पडली. शासकीय वैद्यकीय महाविद्यालयाच्या बालरोग विभाग आणि इंडियन अकॅडमी ऑफ पेडियाट्रिक्स (आयएपी) छत्रपती संभाजीनगर शाखेच्या संयुक्त विद्यमाने बजाज अध्यापन संकुलात आयोजित या स्पर्धेत विविध वैद्यकीय महाविद्यालयांतील विद्यार्थ्यांनी ज्ञानाची चुरस रंगवली.



स्पर्धेचे उद्घाटन महाविद्यालयाचे अधिष्ठाता डॉ. शिवाजी सुक्रे यांच्या हस्ते झाले. यावेळी उपअधिष्ठाता (पदव्युत्तर) डॉ. गायत्री तडवलकर, बालरोग विभागप्रमुख डॉ. प्रभा खैरे, उपअधिष्ठाता (पदवी) डॉ. विनोद मुंडाडा, आयएपी छत्रपती संभाजीनगर शाखेच्या अध्यक्षा डॉ. संध्या कोंडापल्ले आणि सचिव डॉ. विनोद तोतला यांची प्रमुख उपस्थिती होती.

या विभागीय स्पर्धेत छत्रपती संभाजीनगर, लातूर, अंबाजोगाई आणि जालना येथील आठ वैद्यकीय महाविद्यालयांच्या पदव्युत्तर विद्यार्थ्यांच्या संघांनी सहभाग नोंदविला. नवजात शिशुरोग, संसर्गजन्य आजार, बालहृदयरोग, बालमूत्रपिंड विकार, पोषण, लसीकरण, आपत्कालीन बालरोग तसेच बालरोगशास्त्रातील नव्या संशोधनांवर आधारित विविध फेऱ्यांमधून विद्यार्थ्यांच्या ज्ञानाची कसोटी घेण्यात आली.

स्पर्धेच्या माध्यमातून पदव्युत्तर विद्यार्थ्यांना अद्ययावत वैद्यकीय ज्ञान आत्मसात करण्याची संधी मिळाली. तसेच विविध संस्थांतील विद्यार्थ्यांमध्ये शैक्षणिक देवाणघेवाण, चिकित्सक विचारसरणी आणि निरोगी स्पर्धेची भावना अधिक दृढ झाली. कार्यक्रमास विविध वैद्यकीय महाविद्यालयांतील प्राध्यापक, निवासी डॉक्टर आणि विद्यार्थ्यांनी मोठ्या संख्येने उपस्थित राहून स्पर्धेला उत्स्फूर्त प्रतिसाद दिला.

## एलोरा स्कूलच्या चिमुकल्यांनी शाळेतच अनुभवली पंढरीची वारी

हिंदू प्रकाशवार्ता : प्रतिनिधी

**छत्रपती संभाजीनगर :** बीड बायपास खडी रोडवरील एलोरा इंग्लिश स्कूलमध्ये आषाढी एकादशी उत्साह आणि भक्तिमय वातावरणात साजरी करण्यात आली. विद्यार्थ्यांनी विठ्ठल-रुक्मिणी तसेच संत तुकाराम महाराज यांच्या वेशभूषेतून पंढरीच्या वारीचा आनंद शाळेच्या परिसरातच अनुभवला.




कार्यक्रमाची सुरुवात भक्तिगीतांनी झाली. यावेळी श्रीमती अश्विनी काळे आणि श्रीमती लीना जोशी यांनी विद्यार्थ्यांना आषाढी एकादशीचे धार्मिक व सांस्कृतिक महत्त्व समजावून सांगितले.

सार्थक सोळंके, उत्कर्ष शिंदे आणि श्रुत्वांश भालेराव यांनी विठ्ठलाची वेशभूषा साकारली. तर आराध्या आगलावे, शिवन्या केरे, भाविका देवकर, आरोही भोसले, प्रणवी चव्हाण, शांभवी गाडेकर, शिवानी गाडेकर, अन्वी चाकोर, आर्या, शिवांश अल्हाट, ओवी आणि त्रिशा लिंगायत यांनी रुक्मिणीच्या वेशभूषेतून उपस्थितांची मने जिंकली.

इयत्ता दुसरीतील विराज काळे पाटील याने संत तुकाराम महाराजांची वेशभूषा करून त्यांच्या अभंगाचे सादरीकरण केले. त्याच्या या सादरीकरणाला उपस्थितांकडून उत्स्फूर्त दाद मिळाली.

याशिवाय, शाळेच्या संगीत विभागातील विद्यार्थिनींनी विविध अभंगांचे सुमधुर सादरीकरण करून कार्यक्रमात भक्तिरसाची रंगत आणली. कार्यक्रमाच्या यशस्वी आयोजनासाठी हरजित कौर सौदी, निलाक्षी राव, स्वाती देशमुख, सुवर्णा क्षीरसागर, मनीषा फुलारे, रुपाली नलवाडे, रोहिणी लबडे, स्नेहा जोहरे, पूजा शेळके आणि वैष्णवी काथार या शिक्षिकांनी विशेष परिश्रम घेतले.

## कॅबिनेट मंत्री अतुल सावे रंगले देवगिरी बँकेच्या पर्यावरण वारीत



हिंदू प्रकाशवार्ता : प्रतिनिधी

**छत्रपती संभाजीनगर :** आषाढी एकादशीच्या पावन निमित्ताने देवगिरी नागरी सहकारी बँकेच्या कर्मचाऱ्यांनी आयोजित केलेल्या पर्यावरण वारीला भक्ती, उत्साह आणि एकोप्याची अनोखी किनार लाभली. बँकेचे कर्मचारी, संचालक आणि पदाधिकारी एकसमान गणवेश परिधान करून मोठ्या उत्साहात वारीत सहभागी झाले.

या वारीत महाराष्ट्राचे कॅबिनेट मंत्री अतुल सावे यांनी विशेष उपस्थिती लावत कर्मचाऱ्यांसोबत पावली खेळत वारीचा आनंद लुटला. त्यांच्या उत्स्फूर्त सहभागामुळे वारीतील भक्तिमय वातावरण अधिकच रंगले. विठ्ठलनामाच्या गजरात आणि टाळ-मृदंगाच्या तालावर वारी पुढे सरकत असताना मंत्री सावे यांनीही कर्मचाऱ्यांसमवेत पावले टाकत उपस्थितांचे लक्ष वेधून घेतले.

वारीत देवगिरी नागरी सहकारी बँकेचे अध्यक्ष किशोर शितोळे, मुख्य कार्यकारी अधिकारी प्रवीण नांदेडकर, संचालिका प्रज्ञा तल्लार, संचालिका अमिताताई लेकुरवाळे, संचालक सुरेश जगाडे, उपमुख्य कार्यकारी अधिकारी रूपेंद्र कोयाळकर, उपमुख्य कार्यकारी अधिकारी दत्ता शिंदे यांच्यासह बँकेचे अधिकारी, कर्मचारी आणि पदाधिकारी मोठ्या संख्येने सहभागी झाले.

## मस्जिद बंदर येथे म्हाडाच्या इमारतीचा भाग कोसळला; 6 जणांची सुटका, 2 जखमी

**मुंबई:** मुंबईतून एक मोठी दुर्घटना टळल्याची बातमी समोर आली आहे. शनिवारी दुपारी मुंबईतील अत्यंत दाट वस्तीच्या आणि वर्दळीच्या मस्जिद बंदर परिसरातील म्हाडाच्या उपकर आकारणी (सेस) केलेल्या इमारतीच्या सहाव्या मजल्याचा काही भाग थेट पाचव्या मजल्यावर कोसळल्याची घटना घडली. या दुर्घटनेत दोन व्यक्ती जखमी झाल्या असून अग्निशमन दल आणि प्रशासकीय यंत्रणेच्या तत्परतेमुळे इमारतीत अडकलेल्या सर्व ६ जणांना सुखरूप बाहेर काढण्यात यश आले आहे. मुंबई महानगरपालिकेच्या आपत्ती व्यवस्थापन कक्षाकडून मिळालेल्या अधिकृत माहितीनुसार, ही दुर्घटना मस्जिद बंदर येथील विठ्ठलदास चंदन स्ट्रीटवर स्थित असलेल्या 'लोखंडवाला बिल्डिंग' मध्ये घडली. शनिवारी दुपारी १२ वाजून ३४ मिनिटांनी इमारतीचा भाग कोसळल्याची माहिती मुंबई अग्निशमन दलाला देण्यात आली.

## जिल्हा परिषद प्राथमिक शाळा मादणी येथे शिक्षण परिषदेचे यशस्वी आयोजन



**मादणी, दि. २५ जुलै :** जिल्हा परिषद प्राथमिक शाळा मादणी येथे शिक्षण विभागाच्या वतीने शिक्षण परिषदेचे उत्साहपूर्ण वातावरणात आयोजन करण्यात आले. या परिषदेत शिक्षकांच्या शैक्षणिक गुणवत्ता वृद्धीसाठी विविध विषयांवर सखोल मार्गदर्शन करण्यात आले. या कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी नुकतेच नियुक्त झालेले शिवना केंद्राचे केंद्र प्रमुख श्री सावळे सर होते. प्रमुख उपस्थिती म्हणून श्री एन. जे. भोंबे सर, केंद्रीय मुख्याध्यापक श्री रोहिले सर तसेच मादणी उर्दू प्राथमिक शाळेचे माजी मुख्याध्यापक श्री काझी सर उपस्थित होते. उपस्थित मान्यवरांनी शिक्षकांना गुणवत्तापूर्ण शिक्षण, विद्यार्थीकेंद्रित अध्यापन आणि शैक्षणिक उपक्रम अधिक प्रभावीपणे राबविण्याबाबत मौल्यवान मार्गदर्शन केले.

कार्यक्रमाचे सूत्रसंचालन श्री अजय जेउघाले सर यांनी अतिशय प्रभावी आणि ओघवत्या शैलीत केले. शिक्षण परिषदेतील प्रमुख विषयांचे सादरीकरण श्री कदम सर आणि श्री उगले सर यांनी केले. त्यांनी शिक्षण परिषदेतील महत्त्वाचे मुद्दे, नवीन शैक्षणिक उपक्रम, अध्यापनातील नावीन्यपूर्ण पद्धती तसेच विद्यार्थ्यांच्या सर्वांगीण विकासासाठी आवश्यक बाबी अतिशय सोप्या व समजण्यास सुलभ भाषेत शिक्षकांसमोर मांडल्या. त्यांच्या मार्गदर्शनामुळे उपस्थित शिक्षकांना अध्यापन अधिक परिणामकारक करण्यासाठी उपयुक्त दिशा मिळाली. अध्यक्षीय समारोपात श्री सावळे सर यांनी शिक्षकांनी गुणवत्तापूर्ण शिक्षणासाठी सातत्याने प्रयत्नशील राहावे, विद्यार्थ्यांच्या प्रगतीसाठी नवीन उपक्रम राबवावेत तसेच शिक्षण परिषदेतून मिळालेल्या ज्ञानाचा प्रत्यक्ष अध्यापनात प्रभावी वापर करावा, असे आवाहन केले.

## आषाढी एकादशीनिमित्त श्री गजानन महाराज मंदिरात भाविक भक्तांना साबुदाणा खिचडीचे वाटप



सावळदबारा : दि. २५ जुलै रोजी आषाढी एकादशीनिमित्त सावळदबारा येथील श्री गजानन महाराज मंदिर येथे भाविक भक्तांनी दर्शन घेतले,

भाविक भक्तांना साबुदाणा खिचडीचे वाटप करण्यात आले. कोलते परिवाराच्या वतीने आयोजन करण्यात आले होते


सावळदबारा-देव्हारी येथील श्री गजानन महाराज मंदिर येथे भाविक भक्तांना साबुदाणा खिचडीचे वाटप भाजपचे सोयगाव तालुका सरचिटणीस गुलाबराव पाटील कोलते यानी केले

यावेळी जय कालंका देवी शिक्षण संस्थेचे अध्यक्ष भावराव कोलते, माजी प्राचार्य नारायण कोलते, प्रा. जीवन कोलते होते भाविक भक्त मोठ्या संख्येने उपस्थित होते.

## आई एकवीरा मातेच्या जयघोषात 9 ऑगस्ट रोजी 'भव्य बाईक रॅली'

हिंदू प्रकाश वार्ता प्रतिनिधी

**उरण / रायगड :** आई एकवीरा मातेच्या भक्तीभावाने प्रेरित होऊन आई एकवीरा मंदिर, कोप्रोली,उरण ते श्री क्षेत्र कार्ला (एकवीरा) गड अशी भव्य बाईक रॅलीचे आयोजन रविवार, दि. ०९ ऑगस्ट २०२६ रोजी करण्यात आले आहे.



उरण मध्ये पहाटे ६.३० वाजता आई एकवीरा मंदिरात आरती झाल्यानंतर उरण मधून रॅलीला सुरुवात होणार आहे. त्यानंतर छत्रपती शिवाजी महाराजांना मानवंदना देऊन ढोल-ताशांच्या गजरात रॅली मार्गस्थ होईल. श्री क्षेत्र कार्ला येथील आई एकवीरा मातेचे दर्शन घेतल्यानंतर आई एकवीरा मंदिर परिसराची स्वच्छता, वृक्षारोपण आणि सामाजिक उपक्रम राबविण्यात येणार असून, भक्तीबरोबरच सामाजिक बांधिलकी जपण्याचा संदेश देण्यात येणार आहे.

या भव्य बाईक रॅलीच्या आयोजनात विविध गावातील भाविक भक्तांचा सहभाग आहे.रॅलीच्या आयोजनासाठी संपूर्ण नियोजन व मार्गदर्शन संस्थापक देविचंद अनंत म्हात्रे यांच्या नेतृत्वाखाली करण्यात आले आहे. आई एकवीरा मातेच्या जयघोषाने आणि छत्रपती शिवाजी महाराजांच्या विचारांनी प्रेरित या भव्य बाईक रॅलीत शिवप्रेमी, एकवीरा भक्त आणि नागरिकांनी मोठ्या संख्येने सहभागी व्हावे, असे आवाहन आयोजकांकडून करण्यात आले आहे.

**नाव नोंदणी व संपर्कासाठी फोन नंबर :-** विकी कोळी (कोप्रोली) – ९८२०६७३४८४, जितू कोळी (कोप्रोली) – ९९३०३०५२५५, चेतन गावंड (पिरकोन) – ९८१९६७९९०५, विधाता पाटील (कोप्रोली) – ९९२०६३२०२१, कुणाल म्हात्रे (कोप्रोली) – ७७७७००१०८७, प्रसाद पाटील (गोठ्या) – ७९६६६०४०३२, विनायक गावडे (पिरकोन) – ८०७९२९५४७६, दूशंत ठाकूर (पानदिवे) – ८८२८६८६६९७, अक्षय मोकाशी (पानदिवे) – ८०८२२५८८२९, संस्थापक देविचंद अनंत म्हात्रे – ९८२१८३८४०८.



**जिंतूर - राज्यमंत्री तथा पालकमंत्री मेघना दीदी साकोरे - बोर्डीकर यांच्या हस्ते व्हाईस ऑफ मीडियाच्या जिंतूर तालुकाध्यक्ष पदी सचिन रायपत्रीवार यांची नियुक्ती झाल्या बद्दल सत्कार करण्यात आला. त्या वेळी डॉ पंडित दराडे, मंडळ अध्यक्ष विलास भंडारी, सचिन आढे, विजय जाधव, प्रकाश गोरे, विष्णू बोर्डीकर, आदी उपस्थित होते.**

# समता भक्ती प्रेम सेवा आणि मानवतेचा महाउत्सव आषाढी एकादशी : सुमनताई गव्हाणे

हिंदू प्रकाश वार्ता प्रतिनिधी

**परभणी :** येथील युवक विकास शिक्षण प्रसारक मंडळ यांनी सर्व विद्यार्थ्यांना एकत्र घेऊन आषाढी एकादशी निमित्त दिंडीचे आयोजन केले.

आषाढी एकादशी निमित्त महाराष्ट्राची वारकरी परंपरा महाराष्ट्रातील सर्वसामान्यांचे कुलदैवत श्री पांडुरंग ज्ञानदेव रचिला पाया. तुका झालासे कळस. या ओळीत महाराष्ट्राच्या वारकरी संप्रदायाचा संपूर्ण इतिहास आणि अध्यात्मिक उंची सामावलेली आहे. महाराष्ट्राच्या सांस्कृतिक सामाजिक आणि अध्यात्मिक जीवनात वारकरी संप्रदायाला अत्यंत मानाचे स्थान आहे. आषाढी एकादशी हा या परंपरेतील सर्वात महत्त्वाचा उत्सव मानला जातो. लाखो वारकरी ज्ञानोबा तुकोबाचा जयघोष करत पायी चालत पंढरपूरला जातात आणि आपल्या लाडक्या विठुरायाचै दर्शन घेतात ही केवळ धार्मिक यात्रा नसून समता. भक्ती. प्रेम. सेवा आणि मानवतेचा महाउत्सव आहे...

तसेच या शाळेत वारकरी संप्रदायाची सुरुवात संत ज्ञानेश्वर. संत नामदेव. संत एकनाथ. संत तुकाराम. संत चोखामेळा. संत जनाबाई. संत सावता माळी. संत गोरा कुंभार. संत नरहरी सोनार. संत सेना महाराज यासारख्या संतांनी केली. या संतांनी जातीपातीच्या भिंती मोडून सर्वांना भक्तीचा समान अधिकार दिला. वारकरी संप्रदायात वारी म्हणजे दरवर्षी आषाढी आणि कार्तिकी एकादशीला पंढरपूरला पायी जाणे. या यात्रेत



कोणताही भेदभाव नसतो. श्रीमंत गरी ब स्त्री पुरुष सर्व जाती धर्मातील लोक एकाच दिंडीत चालतात गळ्यात तुळशीची माळ. कपाळी गोपी चंदनाचा टिळा. हातात टाळ आणि मुखी विठ्ठलाचे नाम हे वारकऱ्यांचे वैशिष्ट्य आहे संत ज्ञानेश्वर महाराज म्हणतात.

अवघाची संसार सुखाचा करीन।
आनंदे भरीन तिन्ही लोक।

या ओवीत संतांनी संपूर्ण मानव जातीच्या कल्याणाची भावना व्यक्त केली आहे.

हिंदू पंचांगानुसार आषाढ शुद्ध एकादशीला आषाढी एकादशी म्हणतात. या तीनही श्री विठ्ठलाच्या दर्शनासाठी लाखो भाविक पंढरपूर येथे जमतात. देहूहून संत तुकाराम महाराजांची पालखी आणि आळंदीहून संत ज्ञानेश्वर महाराजांची पालखी अनेक दिवसांचा प्रवास करून पंढरपूरला पोहोचते.

तसेच या दिवशी उपवास. हरिपाठ. अभंगगायन. किर्तन आणि नामस्मरण यांना विशेष महत्त्व असते. वारकरी राम कृष्ण हरी. ज्ञानोबा तुकोबा आणि विठ्ठल विठ्ठल जय हरी विठ्ठल या नामघषा तल्लीन होतात..

... महाराष्ट्राचे कुलदैवत.. श्री पांडुरंग.. महाराष्ट्रातील असंख्य कुटुंबाचे कुलदैवत म्हणजे श्री पांडुरंग.. भक्त पुंडलिकाच्या सेवाभावामुळे श्री विष्णू स्वतः पंढरपूरला आले आणि विटेवर उभे राहिले अशी आख्यायिका प्रसिद्ध आहे. म्हणूनच विठ्ठलाला विटेवरी उभा असे संबोधले जाते.

संत नामदेव म्हणतात....
तीर्थ विठ्ठल क्षेत्र विठ्ठल।
देव विठ्ठल. देवपूजा विठ्ठल।

या अभंगातून विट्ठल हां भक्तांसाठी सर्वस्व असल्याचे स्पष्ट होते. विठ्ठलाच्या मूर्तीची वैशिष्ट्ये म्हणजे. कमरेवर ठेवलेले हात गळ्यात तुळशी माळ मस्तकी मुकुट आणि विटेवर उभे असलेले रूप. हे रूप भक्ताला कर्मयोग धैर्य आणि सेवाभावाचा संदेश देते. पुंडलिक हा सुरुवातीला आई-वडिलांचा अवमान करणारा होता. परंतु नंतर त्याला मातृ पितृसेवेचे महत्त्व समजले तू आई-वडिलांची इतक्या निष्ठेने सेवा करू लागला की श्री विष्णू त्यांच्या भेटीस आले. त्यावेळी सेवेत व्यत्यय येऊ नये म्हणून पुंडलिकाने वीट फेकून या विटेवर उभे राहा अशी विनंती केली. भगवान त्या विटेवर उभे राहिले आणि तेथूनच विठ्ठल हे रूप प्रसिद्ध झाले. ही कथा भारतीय संस्कृतीतील मात्र पित्र सेवेचे सर्वोच्च उदाहरण मानली जाते. वारकरी परंपरेचे सर्वात मोठे योगदान म्हणजे मराठी संत साहित्य. ज्ञानेश्वरी. अमृतानुभव. अभंग. भारुडे. गवळणी आणि हरिपाठ.

## आषाढी एकादशीनिमित्त जिंतूर भक्तिमय; विद्यार्थ्यांच्या दिंड्यांनी शहर दुमदुमले

**जिंतूर, ता. २५ (बातमीदार):** आषाढी एकादशीच्या निमित्ताने जिंतूर शहरात धार्मिक व भक्तिमय वातावरण निर्माण झाले. शहरातील विविध शाळांतील विद्यार्थ्यांनी विठ्ठल, रुक्मिणी, संत व वारकऱ्यांच्या वेशभूषेत आकर्षक दिंड्या काढत विठ्ठलनामाचा गजर केला. टाळ-मृदंगाच्या तालावर अभंगगायन, फुगड्या आणि पारंपरिक सादरीकरणामुळे शहरातील वातावरण भक्तिरसात न्हाऊन निघाले.



शहरातील विविध शाळांमधून निघालेल्या दिंड्या शिवाजी चौक, वरुड वेस मार्गे श्री विठ्ठल मंदिरात दाखल झाल्या. मार्गावर नागरिकांनी पुष्पवृष्टी करून विद्यार्थ्यांचे उत्स्फूर्त स्वागत केले. श्री जवाहर विद्यालय, ज्ञानेश्वर विद्यालय, विद्या व्हॅली इंग्लिश स्कूल, संचारेश्वर विद्यालय, श्रीमती शकुंतला बोर्डीकर विद्यालय, चैतन्वोदय गुरुकुल आश्रम तसेच शहरातील अन्य शाळांतील विद्यार्थ्यांनी संतांचे देखावे, वारकरी वेशभूषा आणि दिंड्यांद्वारे वारकरी परंपरेचे दर्शन घडविले.

आषाढी एकादशीनिमित्त जिंतूरचे प्रति पंढरपूर म्हणून ओळखल्या जाणाऱ्या पुरातन श्री विठ्ठल मंदिरात पहाटे पाच वाजता महाअभिषेक करण्यात आला. त्यानंतर रामकृष्ण हरी प्रभात फेरी मंडळाच्या वतीने पांडुरंग-रुक्मिणीची पालखी शहरातून भव्य दिंडीसह मिरविण्यात आली. "रामकृष्ण हरी"च्या अखंड गजराने संपूर्ण शहर दुमदुमून गेले.

दिवसभर मंदिरात दर्शनासाठी भाविकांची मोठी गर्दी होती. विविध शाळांतील विद्यार्थ्यांच्या दिंड्या, विठ्ठल-रुक्मिणी व वारकरी देखावे यामुळे मंदिर परिसराला पंढरपूरचे स्वरूप प्राप्त झाले होते. भक्ती, संस्कार आणि वारकरी परंपरेचा संगम घडविणाऱ्या या उपक्रमाचे नागरिकांनीही मोठ्या उत्साहाने स्वागत केले.

## ब्लू माऊंटेन प्री स्कूलमध्ये आषाढी एकादशी भक्तिमय वातावरणात साजरी

हिंदू प्रकाशवार्ता । प्रतिनिधी

**बिडकीन दि २५ जुलै, :** पैठण तालुक्यातील बिडकीन येथील सेठ मोतीलाल तोतला शैक्षणिक संस्था संचालित ब्लू माऊंटेन प्री स्कूल येथे आषाढी एकादशीचा पवित्र उत्सव दरवर्षीप्रमाणे यंदाही अत्यंत भक्तिमय आणि उत्साहपूर्ण वातावरणात साजरा करण्यात आला. भारतीय संस्कृती, संतपरंपरा आणि वारकरी संप्रदायाचे महत्त्व विद्यार्थ्यांपर्यंत पोहोचावे तसेच त्यांच्या मनामध्ये संस्कार, भक्ती आणि सांस्कृतिक मूल्यांची रुजवण व्हावी, या उद्देशाने विविध धार्मिक व सांस्कृतकि कार्यक्रमांचे आयोजन करण्यात आले.

कार्यक्रमाची सुरुवात शाळेच्या संचालिका सविता तोतला यांच्या हस्ते भगवान



श्री विठ्ठल-रखुमाई यांच्या प्रतिमेचे पूजन व पुष्पहार अर्पण करून करण्यात आली. यावेळी "पांडुरंग... पांडुरंग..." तसेच "ज्ञानोबा-तुकाराम"च्या जयघोषाने संपूर्ण परिसर भक्तिमय झाला. यावेळी विद्यार्थ्यांना मार्गदर्शन करताना संचालिका सविता तोतला यांनी आषाढी एकादशीचे धार्मिक, सांस्कृतिक आणि सामाजिक महत्त्व सांगत संत ज्ञानेश्वर, संत तुकाराम यांच्या विचारांचे अनुसरण करून सत्य, प्रामाणिकपणा, सेवा आणि मानवतेचा मार्ग स्वीकारण्याचे आवाहन केले. विद्यार्थ्यांनी संतांच्या अभंगांचे सुमधुर सादरीकरण, ओव्या, भाषणे आणि भक्तिरसाने ओतप्रोत भरलेली नृत्ये सादर करून उपस्थितांची मने जिंकली. त्यांच्या आकर्षक सादरीकरणाला उपस्थितांनी दाद दिली. कार्यक्रमाचे विशेष आकर्षण म्हणजे विद्यार्थ्यांनी केलेली पारंपरिक वारकरी वेशभूषा. टाळ, मृदुंग, वारकरी पोशाखात सहभागी झालेल्या विद्यार्थ्यांनी दिंडीचे मनोहारी सादरीकरण केले. काही विद्यार्थ्यांनी भगवान श्री विठ्ठल आणि माता रखुमाई यांची वेशभूषा परिधान करून कार्यक्रमाची शोभा अधिक खुलवली. शाळेच्या प्रांगणात टाळ-मृदुंगाच्या गजरात विठ्ठल नामाचा अखंड गजर, फुगडी आणि पालखी दिंडीमुळे संपूर्ण वातावरण भक्तिमय झाले.

यावेळी "स्वच्छ वारी – सुंदर वारी" हा सामाजिक संदेशही विद्यार्थ्यांनी दिला. या कार्यक्रमाच्या यशस्वी आयोजनासाठी शाळेतील सर्व शिक्षिका, शिक्षकेतर कर्मचारी आणि विद्यार्थ्यांनी परिश्रम घेतले.

## विठ्ठलनामाच्या गजरात ब्लू व्हॅली इंग्लिश स्कूलमध्ये आषाढी एकादशी उत्साहात

हिंदू प्रकाशवार्ता । प्रतिनिधी

**बिडकीन दि २५ जुलै, :** पैठण तालुक्यातील बिडकीन येथील सेठ मोतीलाल तोतला शैक्षणिक संस्था संचालित ब्लू व्हॅली इंग्लिश स्कूलमध्ये आषाढी एकादशीचा पवित्र उत्सव दरवर्षीप्रमाणे यंदाही अत्यंत भक्तिमय आणि उत्साहपूर्ण वातावरणात साजरा करण्यात आला. भारतीय संस्कृती, संतपरंपरा आणि वारकरी संप्रदायाचे महत्त्व विद्यार्थ्यांपर्यंत पोहोचावे, तसेच त्यांच्यामध्ये आध्यात्मिक व सांस्कृतिक मूल्यांची जपणूक व्हावी, या उद्देशाने विविध धार्मिक व सांस्कृतिक कार्यक्रमांचे आयोजन करण्यात आले होते. कार्यक्रमाची सुरुवात शाळेचे संस्थापक अध्यक्ष सतीश तोतला व मुख्याध्यापिका सविता तोतला




यांच्या हस्ते भगवान श्री विठ्ठल-रखुमाई यांच्या मूर्तीचे पुष्पहार अर्पण करून व विधीवत पूजनाने करण्यात आली.

यावेळी संपूर्ण परिसर "पांडुरंग... पांडुरंग..." आणि "ज्ञानोबा-तुकाराम" यांच्या जयघोषाने भक्तिमय झाला. यावेळी विद्यार्थ्यांना मार्गदर्शन करताना संस्थापक अध्यक्ष सतीश तोतला यांनी सांगितले की, "आषाढी एकादशी हा केवळ धार्मिक उत्सव नसून तो श्रद्धा, भक्ती, समता, सेवा, शिस्त आणि संस्कार यांचा संदेश देणारा दिवस आहे. संतांनी समाजाला दिलेले विचार, मानवतेचा संदेश आणि वारकरी परंपरेतील एकात्मता प्रत्येक विद्यार्थ्याने आपल्या जीवनात अंगीकारावी. आधुनिक शिक्षणासोबत भारतीय संस्कृती आणि मूल्यांचे जतन करणे ही काळाची गरज आहे. मुख्याध्यापिका सविता तोतला यांनी आपल्या मनोगतात विद्यार्थ्यांना संत साहित्याचे महत्त्व, विठ्ठल भक्तीची परंपरा आणि आषाढी वारीचे वैशिष्ट्य याविषयी सविस्तर माहिती दिली.

त्यांनी विद्यार्थ्यांना प्रामाणिकपणा, शिस्त, परिश्रम, सहकार्य आणि समाजसेवेची भावना जोपासण्याचे आवाहन करत, शिक्षणाबरोबरच संस्कार हेही तितकेच महत्त्वाचे असल्याचे सांगितले. या निमित्ताने विद्यार्थ्यांनी विठ्ठल भक्तीपर गीतांचे सुमधुर गायन केले. संत ज्ञानेश्वर, संत तुकाराम यांच्या अभंगांचे सादरीकरण, ओव्या, प्रभावी भाषणे तसेच भक्तिरसाने ओतप्रोत भरलेली नृत्ये सादर करून उपस्थितांची मने जिंकली.

विद्यार्थ्यांच्या आकर्षक सादरीकरणाला उपस्थितांकडून उत्स्फूर्त दाद मिळाली. उत्सवाचे विशेष आकर्षण म्हणजे विद्यार्थ्यांनी केलेली पारंपरिक वारकरी वेशभूषा. अनेक विद्यार्थी वारकरी पोशाखात टाळ, मृदुंग, तुळशीची माळ, भगवी पताका घेऊन सहभागी झाले होते, तर काही विद्यार्थ्यांनी भगवान श्री विठ्ठल आणि माता रखुमाई यांची वेशभूषा परिधान करून कार्यक्रमाची शोभा अधिक खुलवली. शाळेच्या प्रांगणात पारंपरिक पद्धतीने रिंगण आयोजित करण्यात आले. विद्यार्थ्यांनी टाळ-मृदुंगाच्या गजरात पाऊले टाकत, फुगडी खेळत आणि विठ्ठल नामाचा अखंड गजर करत भक्तिमय वातावरण निर्माण केले. त्यानंतर शाळेच्या परिसरातून आकर्षक पालखी दिंडी काढण्यात आली. दिंडीत विद्यार्थी, शिक्षक व शिक्षकेतर कर्मचारी मोठ्या उत्साहाने सहभागी झाले. भगव्या पताका, टाळ-मृदुंगाचा निनाद, विठ्ठल नामाचा गजर आणि वारकरी वेशभूषेमुळे संपूर्ण परिसर भक्तिरसाने न्हाऊन निघाला. या कार्यक्रमाच्या यशस्वी आयोजनासाठी शाळेतील सर्व शिक्षक-शिक्षिका, शिक्षकेतर कर्मचारी तसेच विद्यार्थ्यांनी परिश्रम घेतले. या उपक्रमामुळे विद्यार्थ्यांना भारतीय संस्कृती, संतपरंपरा, वारकरी संप्रदाय आणि सामाजिक ऐक्याचे महत्त्व प्रत्यक्ष अनुभवता आले.

## नारीशक्ती प्रभागसंघ, शिवना आढावा बैठक संपन्न

**अजिंठा प्रतिनिधी :** आज दिनांक 24/07/2026 रोजी नारीशक्ती प्रभागसंघ, शिवना येथे प्रभागसंघाची आढावा बैठक उत्साहपूर्ण वातावरणात संपन्न झाली.


बैठकीस जिल्हा परिषद सदस्या मा. निकिता ताई काळे प्रमुख पाहुण्या म्हणून उपस्थित होत्या. त्यांनी प्रभागसंघामार्फत सुरू असलेल्या विविध कामांचा आढावा घेतला. तसेच महिला बचत गटांच्या आर्थिक सक्षमीकरणासाठी नवीन व्यवसायांच्या संधी, नियोजन आणि प्रभावी अंमलबजावणी याबाबत मोलाचे मार्गदर्शन केले व सर्व महिलांना पुढील वाटचालीसाठी शुभेच्छा दिल्या. बैठकीमध्ये खालील विषयांवर सविस्तर आढावा घेऊन आवश्यक सूचना देण्यात आल्या.

नवीन महिला बचत गटांची स्थापना करणे. LOKOS प्रणालीमध्ये नवीन गटांचे ऑनलाइन नोंदणीचे काम वेळेत पूर्ण करणे. SHG व VO स्तरावरील Cut-off Sheet अचूक व वेळेत भरून पूर्ण करणे. नवीन व्यवसाय सुरू करण्यासाठी आवश्यक नियोजन व मार्गदर्शन. प्रभागातील प्रलंबित कामे तातडीने पूर्ण करून नियमित पाठपुरावा करणे. या बैठकीस प्रभागसंघाच्या अध्यक्षा मा. सुचिता ताई काळे, तालुका अभियान व्यवस्थापक श्री. नवनाथ पवार सर, प्रभाग समन्वयक श्री. प्रविण लोखंडे सर, पशुसखी व्यवस्थापक श्री. सागर पांढरे सर, तसेच ग्रामसखी ताई आणि लिपिका ताई उपस्थित होत्या. बैठकीत प्रभागातील विविध उपक्रमांचा आढावा घेऊन आगामी कामकाजाचे नियोजन करण्यात आले. महिलांच्या आर्थिक सक्षमीकरणासाठी सर्वांनी समन्वयाने व गुणवत्तापूर्ण काम करण्याचा निर्धार व्यक्त केला.

## स्वर्गीय अश्विन पाटील मित्र परिवार तर्फे रक्तदान शिबिराचे आयोजन

हिंदू प्रकाश वार्ता प्रतिनिधी

**उरण रायगड :** उरणचे उत्तम खेळाडू स्वर्गीय अश्विन पाटील यांच्या वाढदिवसानिमित्त सामाजिक बांधिलकी जपत अश्विन पाटील मित्र परिवारच्या माध्यमातून श्री साई ब्लड बँक, पनवेल यांच्या सौजन्याने भव्य रक्तदान शिबिराचे आयोजन करण्यात आले आहे. हे रक्तदान शिबिर गुरुवार, दि. ३० जुलै २०२६ रोजी सकाळी १०.०० ते सायंकाळी ४.०० वाजेपर्यंत श्री. मा. बाळासाहेब ठाकरे क्रीडा संकुल, उरण शहर येथे होणार आहे.



"रक्ताचा आहे थेंब थेंब मौल्यवान, याची असावी सर्वांना जाण; म्हणूनच करावे रक्तदान" या सामाजिक संदेशातून नागरिकांनी मोठ्या संख्येने सहभागी होऊन रक्तदान करावे, असे आवाहन आयोजकांकडून करण्यात आले आहे.

रक्तदान हे सर्वश्रेष्ठ सामाजिक कार्य असून, आपल्या एका रक्तदानामुळे गरजू रुग्णाचे प्राण वाचण्यास मदत होऊ शकते. त्यामुळे या उपक्रमात युवकांसह नागरिकांनी उत्स्फूर्तपणे सहभागी होऊन सामाजिक बांधिलकी जपावी, असे आवाहन करण्यात आले आहे.या सामाजिक उपक्रमाचे आयोजक अश्विन पाटील मित्र परिवार असून, वाढदिवसा निमित्त दरवर्षी विविध सामाजिक उपक्रम राबविण्यात येत असल्याचे आयोजकांनी सांगितले आहे.

**रक्तदान शिबिराच्या अधिक माहितीसाठी व नाव नोंदणीसाठी संपर्क :** तुषार पाटील - ८९७६७४६४७४, गणेश पाटील - ९८३३००१३९३, पप्पू सूर्यराव - ९८२१६२५३६२, सागर मसुरकर - ९६९९२६७३५५, मयुरेश पाटील - ८८५०१९९३७३, कौशिक भोईर - ९८९२८६९२९१.

## आषाढी एकादशीनिमित्त छत्रपती शाळेची दिंडी; विठ्ठल नामासह पर्यावरण संवर्धनाचा संदेश

**छत्रपती संभाजीनगर | प्रतिनिधी,:** आषाढी एकादशीनिमित्त विजयनगर येथील छत्रपती प्राथमिक शाळेच्या वतीने पारंपरिक



दिंडीचे आयोजन करण्यात आले. विद्यार्थ्यांनी विठ्ठल-रुक्मिणी व वारकऱ्यांच्या वेशभूषेत सहभागी होत "विठ्ठल... विठ्ठल..." नामघोषाने परिसर भक्तिमय केला.

यावेळी विद्यार्थ्यांनी व शिक्षकांनी वारकऱ्यांचा पारंपरिक वेश परिधान करून विद्यार्थ्यांना व पालकांना वारीचे सांस्कृतिक, सामाजिक महत्त्व सांगितले. दिंडीदरम्यान विद्यार्थ्यांनी पर्यावरण संरक्षण, वृक्षारोपण, शाळाबाह्य मुलांना शिक्षणाच्या प्रवाहात आणणे तसेच अशिक्षित आजी-आजोबांना साक्षर करण्याचा समाजोपयोगी संदेश दिला.

या उपक्रमात मुख्याध्यापिका निर्मला व्यवहारे, सहशिक्षक रामदास वाघमारे,सोनाली पाटील, तुकाराम शिंदे, सुवर्णा पाटील, पालक व विद्यार्थी मोठ्या संख्येने सहभागी झाले. भक्ती, संस्कार आणि सामाजिक बांधिलकीचा सुंदर संगम घडविणाऱ्या या दिंडीचे परिसरातील नागरिकांनी कौतुक केले.

दैनिक
हिंदू प्रकाशवार्ता
PRGI No.: MHMAR/25/A2358 सत्याचा प्रकाश, राष्ट्रवादाचा प्रहरी



# औरंगाबाद टू व्हीलर मेकॅनिक असोसिएशन तर्फे दहा हजार भाविकांना चहा, पाणी व फराळाचे वाटप

## सलग सातव्या वर्षी वाळूज पंढरपूर मार्गावर उभारले सेवाछत्र; वारकऱ्यांच्या सेवेत सामाजिक बांधिलकीचा आदर्श

हिंदू प्रकाशवार्ता : प्रतिनिधी



**छत्रपती संभाजीनगर :** आषाढी वारीनिमित्त प्रतिपंढरपूर म्हणून ओळखल्या जाणाऱ्या वाळूज पंढरपूर येथील विठ्ठल-रुक्मिणी मंदिराकडे जाणाऱ्या वारकऱ्यांच्या सेवेसाठी औरंगाबाद टू व्हीलर मेकॅनिक असोसिएशन, छत्रपती संभाजीनगरच्या वतीने सलग सातव्या वर्षी सेवाछत्र उभारण्यात आले. भगवान महावीर चौक ते लोखंडी पूल या मार्गावर सुमारे दहा हजार भाविकांना चहा, पाणी, फराळ तसेच राजगिरा लाडूंचे वाटप करण्यात आले.

असोसिएशनच्या वतीने सामाजिक बांधिलकी जपत दरवर्षीप्रमाणे यंदाही वारकऱ्यांच्या सेवेसाठी हा उपक्रम राबविण्यात आला. नगरसेवक गणेश नावंदर यांच्या दिंडीसह ईपीएस-९५ राष्ट्रीय संघर्ष समितीचे महाराष्ट्र अध्यक्ष कमलाकर पागरकर यांच्या दिंडीचे टोपी, उपरणे आणि विठ्ठल-रुक्मिणीची मूर्ती देऊन स्वागत व सत्कार करण्यात आला.

मनपा आयुक्त अमोल येडगे, महापौर समीर राजूरकर तसेच सभापती अनिल मकरीये यांनीही सेवाछत्राला भेट देऊन उपक्रमाचे कौतुक केले. यावेळी त्यांचाही टोपी, उपरणे आणि विठ्ठल-रुक्मिणीची मूर्ती देऊन सत्कार करण्यात आला.

राजगिरा लाडूंसाठी आनंद चवरे (चवरे ऑटोमोबाईल, नूतन कॉलनी), भरतशेठ (शिव ऑटोमोबाईल, नूतन कॉलनी) तसेच सुमित महाजन (महाजन ऑटोमोबाईल, वाळूज) यांनी सहकार्य केले.

यावेळी संघटनेच्या पदाधिकाऱ्यांनी सांगितले की, शेकडो किलोमीटरचा पायी प्रवास करून पंढरपूरकडे जाणाऱ्या वारकऱ्यांची सेवा करण्याची संधी मिळणे हे आमच्यासाठी भाग्याची बाब आहे. वारी ही समता, बंधुता आणि मानवतेचा संदेश देणारी परंपरा असून, जात-पात, श्रीमंती-गरिबी यांचे भेद विसरून सर्वजण एकमेकांना 'माऊली' म्हणून सन्मान देतात. या सेवाकार्यात सहभागी होणे हा आमच्यासाठी आनंदाचा आणि समाधानाचा क्षण आहे.

यावेळी संस्थापक अध्यक्ष सय्यद चाँद, कार्याध्यक्ष दादासाहेब तांबे, जिल्हा समन्वय समितीचे अध्यक्ष राम पारखे, उपाध्यक्ष सदाशिव कुमावत, शेख मुन्नाभाई, शेख नुरभाई, रामेश्वर गाडेकर, माजी अध्यक्ष बाळासाहेब पवार, कोषाध्यक्ष शेख इस्माईल, विभागप्रमुख शेख जमीर, सरवर खान, शेख सलीम, अजय राजपूत, जनार्दन गरसुळे, पैठण विभागप्रमुख मोहनराव खडके, महादेव महापुरे, विश्वनाथ बारगजे, महेश गिरगे, लासूर स्टेशन संघटनेचे अध्यक्ष संजय त्रिभुवन, उपाध्यक्ष गोकुळ तिवाडे, भारत सुरासे, चंद्रशेखर औताडे तसेच फुलंब्री मेकॅनिक संघटनेचे अध्यक्ष विष्णू गायकवाड, उपाध्यक्ष कृष्णा तुपे, साजेद मन्सुरी यांच्यासह संघटनेचे पदाधिकारी व सदस्य उपस्थित होते.



**जिंतूर : आषाढी एकादशीच्या निमित्ताने श्री सिद्धेश्वर मंदिरात महादेवाच्या पिंडीवर कणिक, अबीर, तूप आदी साहित्याच्या साहाय्याने साकारण्यात आलेली विठ्ठलाची आकर्षक प्रतिकृती. ही प्रतिकृती उदय दीपकराव रोकडे, कृष्णा करणेवार, राहुल कसबे, संगीता मगर व उदय मगर यांनी साकारली.**

**छाया - सचिन रायपत्रीवार**

# मोटारसायकल चोरीचा गुन्हा उघडकीस; एकास अटक, दोन वाहने जप्त

हिंदू प्रकाशवार्ता प्रतिनिधी

**छत्रपती संभाजीनगर :** चिकलठाणा पोलीस ठाण्याच्या हद्दीत मोटारसायकल चोरीच्या वाढत्या घटनांना आळा घालण्यासाठी पोलिसांनी मोठी कारवाई केली आहे. अपातगाव येथून मोटारसायकल चोरणाऱ्या एका सराईत आरोपीला पोलिसांनी जेरबंद केले असून, त्याच्याकडून चोरीची मोटारसायकलसह एकूण दोन वाहने हस्तगत करण्यात आली आहेत. चिकलठाणा पोलीस ठाण्यात दाखल असलेला गुन्हा (कलम ३०३(२) भारतीय न्याय संहिता) च्या तपासादरम्यान पोलिसांना गोपनीय माहिती मिळाली. या माहितीच्या आधारे पोलिसांनी सापळा रचून अभिजीत सुदर्शन गावंडे (वय २३ वर्षे, रा. गारखेडा नं. १, छत्रपती संभाजीनगर) यास ताब्यात घेतले. पोलिसांनी सखोल चौकशी केली असता, आरोपीने अपातगाव येथून फिर्यादीची काळ्या रंगाची होंडा युनिकॉर्न मोटारसायकल (अंदाजे किंमत ९०,००० रुपये) चोरल्याची कबुली दिली. आरोपीच्या



ताब्यातून ती चोरीची गाडी जप्त करण्यात आली आहे. याशिवाय, कसून चौकशीदरम्यान आरोपीकडून आणखी एक मोटारसायकल (अंदाजे किंमत ४०,००० रुपये) जप्त करण्यात आली असून, त्या दुसऱ्या वाहनाबाबत पोलीस अधिक तपास करत आहेत. आरोपीला २४ जुलै रोजी अधिकृतपणे अटक करण्यात आली आहे.

### वारकऱ्यांच्या सेवेसाठी महानगरपालिका रस्त्यावर; 'स्वच्छतेची वारी... विठुरायाच्या दारी' उपक्रमाने जिंकली मने

# बाबा पेट्रोल पंप ते छोटे पंढरपूर मार्ग झाला स्वच्छ

हिंदू प्रकाशवार्ता प्रतिनिधी

**छत्रपती संभाजीनगर :** आषाढी एकादशीनिमित्त विठुरायाच्या दर्शनासाठी छोट्या पंढरपूरकडे जाणाऱ्या लाखो वारकऱ्यांच्या सेवेला यंदा स्वच्छतेची जोड मिळाली. छत्रपती संभाजीनगर महानगरपालिकेने राबविलेल्या 'स्वच्छतेची वारी... विठुरायाच्या दारी' या अभिनव उपक्रमातून प्रशासनाने केवळ रस्त्यांची स्वच्छता केली नाही, तर वारकऱ्यांच्या सेवेलाच प्राधान्य देत स्वच्छतेचा प्रभावी संदेशही दिला.





महावीर चौक येथून सकाळी १० वाजता महापौर समीर राजूरकर यांच्या हस्ते स्वच्छता दिंडीला प्रारंभ झाला. स्थायी समिती सभापती अनिल मकरिये, विरोधी पक्षनेते अब्दुल समीर साजिद, शहर सुधार समिती सभापती जालिंदर शेंडगे, नगरसेवक शिवाजी दांडगे, नगरसेविका सीमा साळवे, आयुक्त अमोल येडगे, उपआयुक्त (घनकचरा व्यवस्थापन) नंदकिशोर भोंबे यांच्यासह अधिकारी व कर्मचारी मोठ्या संख्येने सहभागी झाले.

बाबा पेट्रोल पंप ते छोटे पंढरपूर या संपूर्ण मार्गावर घनकचरा व्यवस्थापन विभागाचे २०० हून अधिक सफाई कर्मचारी, आयसीटी टीम आणि १० हून अधिक घंटागाड्या कार्यरत होत्या. हातात झाडू, फावडे आणि स्वच्छतेची साधने घेऊन कर्मचाऱ्यांनी मार्गावरील कचरा हटवत वारकऱ्यांना स्वच्छतेचे महत्त्व पटवून दिले. कचरा संकलन, जनजागृती, वारकऱ्यांना मदत आणि आपत्कालीन सेवांसाठी रुग्णवाहिकेची व्यवस्था अशा सर्व बाबींचे नियोजन करण्यात आले होते.

महापौर समीर राजूरकर यांनी या उपक्रमाचे कौतुक करत, आयुक्त अमोल येडगे यांच्या नेतृत्वाखाली महानगरपालिकेने सेवाभाव आणि स्वच्छतेचा आदर्श निर्माण केल्याचे सांगितले. हा उपक्रम दरवर्षी सातत्याने राबविण्यात यावा, अशी अपेक्षा त्यांनी व्यक्त केली.

### मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्या वाढदिवसानिमित्त भाजप अल्पसंख्यांक मोर्चातर्फे भव्य रक्तदान शिबिर

# गरजूंना साडी व धान्याचे वाटप; अल्पसंख्यांक समाजाच्या विकासासाठी संघटन मजबूत करण्याचे आवाहन

**छत्रपती संभाजीनगर | प्रतिनिधी :** महाराष्ट्र राज्याचे यशस्वी व लोकप्रिय मुख्यमंत्री श्री. देवेंद्रजी फडणवीस यांच्या वाढदिवसानिमित्त भारतीय जनता पार्टी अल्पसंख्यांक मोर्चा, छत्रपती संभाजीनगर शहर जिल्हा यांच्या वतीने भव्य रक्तदान शिबिराचे आयोजन करण्यात आले. यावेळी गरजू महिलांना साड्या तसेच गरजू कुटुंबांना धान्याचे वितरण करण्यात आले.



ज्योतीनगर येथील विश्वरूप हॉल येथे आयोजित करण्यात आलेल्या या सामाजिक उपक्रमास भाजप शहर जिल्हाध्यक्ष श्री. किशोर शितोळे, मा. आमदार श्री. संजय केणेकर तसेच माजी केंद्रीय अर्थ राज्यमंत्री मा. डॉ. भागवतजी कराड यांची प्रमुख उपस्थिती होती.

यावेळी उपस्थित मान्यवरांनी रक्तदानाचे महत्त्व अधोरेखित करत समाजातील प्रत्येक घटकाने सामाजिक बांधिलकी जपण्याचे आवाहन केले. तसेच अल्पसंख्यांक समाजाच्या सर्वांगीण विकासासाठी, संघटन अधिक बळकट करण्यासाठी आणि भारतीय जनता पक्षाची विचारधारा घरोघरी पोहोचविण्यासाठी समर्पित भावनेने कार्य करण्याचे आवाहन करण्यात आले. कार्यक्रमाच्या समारोपप्रसंगी मान्यवरांच्या हस्ते रक्तदात्यांना रक्तदान प्रमाणपत्रांचे वितरण करण्यात आले. तसेच गरजू नागरिकांना धान्य व महिलांना साड्यांचे वाटप करण्यात आले.

या सामाजिक उपक्रमाचे आयोजन भारतीय जनता पार्टी अल्पसंख्यांक मोर्चाचे छत्रपती संभाजीनगर शहर जिल्हाध्यक्ष श्री. सलीम चिस्ती यांनी केले होते. कार्यक्रमाचे उत्कृष्ट नियोजन व आयोजन केल्याबद्दल उपस्थितांनी त्यांचे कौतुक केले.

यावेळी भारतीय जनता पार्टी अल्पसंख्यांक मोर्चाचे पदाधिकारी, कार्यकर्ते, रक्तदाते तसेच नागरिक मोठ्या संख्येने उपस्थित होते.

# माझ्या पंढरीची वारी जगात भारी : महेंद्रशेठ घरत

हिंदू प्रकाश वार्ता प्रतिनिधी

**उरण /रायगड :** "माऊली माऊलीच्या जयघोषात, जय जय राम कृष्णा हरी नाम घोषात पंढरपूर दुमदुमले आहे. अक्षरशः लाखो भक्तांचा महासागर पाहून मन तृप्त झाले. पंढरपूरचा शिवाजी चौक ते विठ्ठल मंदिर आणि चंद्रभागा नदीला आलेला भक्तांचा महापूर ओलांडताना आणि असंख्य भक्तांच्या लाटा अंगावर झेलताना आयुष्यातील अविस्मरणीय अनुभव आणि आनंद मिळाला. दिनदुबळे, कष्टकरी विठ्ठलाचरणी लीन होण्यासाठी देशाच्या कानाकोपऱ्यातून आलेले २० ते



२५ लाख भाविक, दर्शनासाठी १५ ते २० किलोमीटर लांबच्या लांब लागलेल्या रांगा पाहून भक्तांच्या सहनशीलतेला आणि श्रद्धेला सलाम करायला हवा. मी जगभर फिरतो; नुकताच अमेरिकेत जाऊन अर्जेंटिना-स्पेन फुटबॉल अंतिम लढतच्या सामन्याचा सहपरिवार आनंद घेतला. तेथून १७ ते १८ तास प्रवास करून आल्यानंतर तातडीने पंढरपूर गाठले. कारण १९९७ पासून मी आषाढी एकादशीची वारी न चुकता दरवर्षी करतो. कोविडचा अपवाद वगळता माझ्या पंढरपूर वारीला २५ वर्षे झाली.

# हजरत जर जारी जर बक्ष (र.अ.) यांच्या 740 व्या उरूस व ईद-ए-मिलादुन्नबी निमित्त पोलीस प्रशासनाकडून दर्गाह परिसराची पाहणी

हिंदू प्रकाशवार्ता प्रतिनिधी
छत्रपती संभाजीनगर

खुलताबाद येथील हजरत ख्वाजा शेख मुंतजबोद्दीन जर जारी जर बक्ष (र.अ.) यांच्या ७४० व्या वार्षिक उरूस मुबारकाचे औचित्य साधून तसेच आगामी ईद-ए-मिलादुन्नबी सणाच्या पार्श्वभूमीवर खुलताबाद शहरात कायदा व सुव्यवस्था सुरळीत राहावी यासाठी पोलीस व प्रशासनाच्या वतीने विशेष खबरदारी घेतली जात आहे. या अनुषंगाने ग्रामीण पोलीस अधीक्षक प्रकाश जाधव, उपविभागीय पोलीस अधिकारी अपराजिता अग्निहोत्री आणि उपविभागीय अधिकारी संतोष गरुड यांनी खुलताबाद येथील



विविध दर्गाहांना प्रत्यक्ष भेट देऊन पाहणी केली व सुरक्षा व्यवस्थेचा सविस्तर आढावा घेतला.

उरूस आणि सणाच्या काळात देशभरातून वपरिसरातून मोठ्या संख्येने भाविक व नागरिक खुलताबाद येथे दाखल होत असतात. गर्दीच्या ठिकाणी अनुचित प्रकार टाळण्यासाठी, वाहतूक व्यवस्था सुरळीत ठेवण्यासाठी आणि कायदा व सुव्यवस्था अबाधित राखण्यासाठी प्रशासनाकडून तगडा बंदोबस्त तैनात करण्यात येणार आहे. याच पार्श्वभूमीवर वरिष्ठ अधिकाऱ्यांनी स्वतः दर्गाह परिसर, रस्ते आणि गर्दीच्या संवेदनशील ठिकाणांची पाहणी करून स्थानिक पोलीस यंत्रणेला आवश्यक त्या सूचने दिल्या. या सदिच्छा व पाहणी दौऱ्यादरम्यान दर्गाह कमिटीच्या वतीने पोलीस अधीक्षक प्रकाश जाधव आणि इतर वरिष्ठ अधिकाऱ्यांचा शाल, पुष्पगुच्छ व पारंपरिक फेटा बांधून सन्मान करण्यात आला.

# राज्यस्तरीय स्पर्धेसाठी छत्रपती संभाजीनगरचा ट्रायथलॉन संघ रवाना

**छत्रपती संभाजीनगर :** जळगाव येथे दि. २५ व २६ जुलै रोजी होणाऱ्या महाराष्ट्र राज्य ट्रायथलॉन असोसिएशन व जळगाव जिल्हा ट्रायथलॉन असोसिएशन यांच्या वतीने आयोजित महाराष्ट्र राज्य ट्रायथलॉन व अक्वाथलॉन स्पर्धेसाठी छत्रपती संभाजीनगर जिल्हा ट्रायथलॉन असोसिएशन चा संघ रवाना झाला आहे.स्पर्धेत खेळडु ट्रायथलॉन व अक्वाथलॉन या क्रीडा प्रकारात सहभागी होणार आहेत यात वयोगट ८ ते २३ वर्षाखालील,व २३ वर्षावरील वयोगटातील खेळाडूंचा समावेश आहे.या संघात जिल्ह्यातील शिरीष यादव,आर्यन देशमुख, पवन धुमाळ, सार्थक तुपे, शेख कबीर, साईराज मुरमुरे,अजिंक्य लाळे,साई नुलवी,आर्यवीर राऊत,रुद्राश लोंढे,श्रीनिवास मोतीयेळे

**मुलींचा संघ :**अभिलाषा पांडे, पौर्णिमा मेश्राम, सई दंडवते, प्रियदर्शनी दिलपाल, राजेश्वरी मराठे यांचा समावेश आहे.



विशेष या संघात पॅरा ट्रायथलिट देवांश आहेवाड,संविधान गाडे, राजवीर ताठे हे सुद्धा सहभागी होणार आहेत. या संघास आंतरराष्ट्रीय ट्रायथलॉन टेकनिकल ऑफिसिअल अभय देशमुख यांचे मार्गदर्शन लाभले आहे. संघा सोबत संघव्यवस्थापक व प्रशिक्षक म्हणून अजय दाभाडे, चरणजितसिंग संघा, अतुल कोरे, अंजुषा मगर यांची निवड झाली आहे. खेळाडूंना जिल्हा ट्रायथलॉन संघटनेचे अध्यक्ष कॅबिनेट मंत्री अतुल सावे,उपाध्यक्ष अशोक काळे, एम जी एम क्रीडा संचालक नितीन घोरपडे, आयर्नमॅन निखिल कचेश्वर, संदीप चव्हाण, डॉ. संदीप जगताप, प्रदीप बुरांडे, सचेंद्र शुक्ला, निखिल पवार आदींनी अभिनंदन करीत शुभेच्छा दिल्या.

# माणगाव तालुक्यात यांत्रिक भातलागवडीचा यशस्वी प्रयोग

## मनुष्यबळाचा अभाव या समस्येवर मात करण्यासाठी शेतकऱ्यांना नवा पर्याय

**बोरघर, माणगांव :** विश्वास गायकवाड माणगाव तालुक्यातील कोशिंबळे तर्फे तळे आणि भुवन येथे 24 जुलै 2026 रोजी लोकप्रतिनिधी, कृषी अधिकारी, कर्मचारी आणि शेतकरी यांच्या उपस्थितीत माणगाव कृषी विभाग आत्मा अंतर्गत यांत्रिक पद्धतीने भात लागवड प्रात्यक्षिक प्रात्यक्षिक यशस्वी प्रयोग करण्यात आला.

मजुरांची टंचाई आणि वाढता खर्च यावर उपाय म्हणून माणगाव कृषी विभागाने यांत्रिक भातलागवडीचे प्रात्यक्षिक घेतले. तालुका कृषी अधिकारी *श्री किरण पडवळकर* यांच्या



मार्गदर्शनात ATMA अंतर्गत खरीप हंगामात तालुक्यातील *93 एकर* क्षेत्रावर यांत्रिक पद्धतीने भात लागवड करण्याचे नियोजन आहे.

प्रात्यक्षिकातील 3 प्रमुख बाबी आणि फायदे

1. *यांत्रिक पद्धतीने भात लावणी + मॅट नर्सरी*

ट्रान्सप्लांटर मशीनद्वारे लावणीचे प्रात्यक्षिक झाले. मशीन *श्री दाऊद गालसुरकर* यांनी उपलब्ध करून दिली.

**फायदा:** वेळ 50% कमी, मजुरांवर अवलंबित्व नाही, उत्पादन वाढ.

2. *बांधावर तूर लागवड*

मुख्य पिकाला बाधा न करता बांधावर तुरीचे बियाणे वाटप.

**फायदा:** अतिरिक्त उत्पन्न, जमिनीतील नत्र वाढ, कमी खर्चात जास्त नफा.

3. *'गोकृपामृतम' जैविक खत निर्मिती*

शेण, गोमूत्र आणि शेतातील कचऱ्यापासून घरच्या घरी खत बनवण्याचे डेमो.

**फायदा:** रासायनिक खतांचा खर्च कमी, जमिनीची सुपीकता वाढ.

मान्यवरांचे मार्गदर्शन

- *श्रीमती वंदना शिंदे, प्रकल्प संचालक आत्मा अलिबाग - यांत्रिकीकरण हाच पर्याय. शेतकरी गटाने महाडीबीटीवर अवजार बँकेसाठी अर्ज करावा. - *श्री किरण पडवळकर, तालुका कृषी अधिकारी माणगाव- आधुनिक तंत्रज्ञान स्वीकारा. बांधावर तूरीने अतिरिक्त उत्पन्न मिळेल. - *श्रीमती मनीषा मालोरे, उपसभापती पंचायत समिती माणगाव - मजुरांअभावी क्षेत्र कमी होत आहे. एकत्र येऊन अवजारे वापरा.

# विठ्ठल नामाच्या गजरात रंगली हरिभक्त परायण अनिल महाराज कोळेकर यांची दिंडी

हिंदू प्रकाशवार्ता प्रतिनिधी

**छत्रपती संभाजीनगर :** आषाढी एकादशीच्या पार्श्वभूमीवर एटखेडा, नाथपुरम आणि नक्षत्रवाडी परिसरातून हरिभक्त परायण अनिल महाराज कोळेकर यांच्या नेतृत्वाखाली पारंपरिक दिंडी सोहळा मोठ्या भक्तिभावाने व उत्साहात पार पडला. विठ्ठल नामाच्या अखंड गजरात, अभंगांच्या सुरेल स्वरात आणि भगव्या पताकांच्या साक्षीने शेकडो वारकरी भाविकांनी या दिंडीत उत्स्फूर्त सहभाग नोंदविला.

दिंडीदरम्यान वारकरी भक्तिभावाने टाळ-मृदंगाच्या गजरात मार्गक्रमण करत होते. पैठण रोडवर वारकऱ्यांसोबत पावली खेळत विठुरायाच्या



नामस्मरणात तल्लीन झालेल्या भाविकांनी वारीचा आनंद लुटला. "ज्ञानोबा-तुकाराम" आणि "पांडुरंग हरी"च्या जयघोषाने संपूर्ण परिसर भक्तिमय वातावरणाने दुमदुमून गेला. या दिंडीमध्ये भारतीय जनता पक्षाचे शहराध्यक्ष किशोर शितोळे यांनीही वारकऱ्यांसोबत खांद्यावर भगवा ध्वज घेऊन भक्तिभावाने सहभाग नोंदविला. यावेळी भाजपा पदाधिकारी राजू शिंदे, विशाल थोरात, सचिन गुगुळे, किशोर मानकापे यांच्यासह अनेक कार्यकर्ते आणि मोठ्या संख्येने वारकरी भाविक उपस्थित होते.

वारी ही केवळ धार्मिक परंपरा नसून समाजात समता, एकता, श्रद्धा आणि भक्तीचा संदेश देणारी जीवनशैली आहे. हरिभक्त परायण अनिल महाराज कोळेकर यांच्या दिंडीने वारकरी संप्रदायाची समृद्ध परंपरा जपत विठ्ठल भक्तीचा संदेश समाजापर्यंत प्रभावीपणे पोहोचविला.

**मुख्य कार्यालय : ऑफिस नं. 515, 5 वा मजला, वास्तू इलाईट स्क्वेअर, बजाज हॉस्पिटल समोर, बीड बायपास रोड, छत्रपती संभाजीनगर- 431010**

हे पत्र प्रकाशक, मालक श्री. रोहित विकास पाटील यांनी मुद्रक श्री. सय्यद परवेझ अहेमद सय्यद इनायत अली यांच्यामार्फत रेड प्रिंटस् , सी-15, संजयनगर, बायजीपुरा, छत्रपती संभाजीनगर-431001 येथे छापून तिरुपती सुप्रीम एन्क्लेव्ह, जालान नगर, छत्रपती संभाजीनगर- 431001 येथून प्रकाशित केले. ▌संपादक : रोहित विकास पाटील ▌email : hinduprakashvarta@gmail.com ▌epaper.hinduprakashwarta.com ▌PRGI No.: MHMAR/25/A2358 ▌संपर्क क्र. : 7261999911